| लातूर | वर्ष ३४ वे | अंक २५४ वा | शुक्रवार, दिनांक ०२ जानेवारी २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## कर्नाटकमधील ८३ टक्के लोकांचा
# इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांवर विश्वास

***नवी दिल्ली/वृत्तसंस्था : कर्नाटकमधील काँग्रेसच्या सरकारने लोकसभा निवडणूक २०२४ संबंधी केलेल्या सर्वेक्षणात राज्यातील ८३ टक्के जनतेने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांवर (ईव्हीएम) विश्वास व्यक्त केला आहे. काँग्रेसचे नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ईव्हीएम आणि निवडणूक आयोगाच्या विश्वासाहर्तेवर वारंवार प्रश्नचिन्ह निर्माण केले होते. निवडणुकीत व्होट चोरी होत असल्याचा आरोपही राहुल गांधी यांनी अलीकडे केला होता. मात्र त्यांच्याच सरकारने केलेल्या सर्वेक्षणात हे दावे खोडून निघाले आहेत, अशी प्रतिक्रिया आता भाजपाने दिली आहे.***

डेक्कन हेराल्डने दिलेल्या बातमीनुसार, कर्नाटकचे मुख्य निवडणूक अधिकारी व्ही. अंबुकुमार यांनी हा सर्व्हे केला होता. बंगळुरू, बेळगाव, कलबुर्गी आणि म्हैसूर प्रशासकीय विभागातील १०२ विधानसभा मतदारसंघ आणि ५१०० लोकांना या सर्वेक्षणात सामील करून घेतले होते.

इव्हॅल्यूएशन ऑफ एंडलाईन सर्व्हे ऑफ कॅप (नॉलेज, अटीट्यूड अँड प्रॅक्टिस) ऑफ सिटिझन, या नावाने या सर्वेक्षणाचा अहवाल प्रकाशित करण्यात आला आहे. यात ८३ टक्के लोकांनी ईव्हीएमवर विश्वास व्यक्त केला. ६९.३९ टक्के लोकांनी ईव्हीएमचा निकाल अचूक असल्याचे म्हटले. तर १४.२२ टक्के लोकांनी ईव्हीएमला संपूर्ण पाठिंबा दिला.

**सर्वेक्षणात काय समजले?**

२०२३ साली झालेल्या सर्वेक्षणात ७७.९ टक्के लोकांनी ईव्हीएमवर विश्वास दर्शवला होता. यंदाच्या सर्व्हेत यात आणखी भर पडली आहे. कलबुर्गी विभागातून सर्वाधिक लोकांनी ईव्हीएमवर विश्वास दाखवला. येथील ८३.२४ टक्के लोकांनी ईव्हीएमवर सहमती दर्शवली. ११.२४ टक्के (एकूण ९४.४८) लोकांनी डोळे झाकून ईव्हीएम सुरक्षित असल्याचे म्हटले. म्हैसूर विभागात ८८.६८ टक्के, बेळगामध्ये ८५.३३ टक्के आणि बंगळुरूमध्ये सर्वात कमी ७३ टक्के लोकांनी सहमती दर्शवली.



या सर्वेक्षणाची माहिती समोर आल्यानंतर कर्नाटक भाजपाचे नेते आर. अशोक यांनी एक्सवर पोस्ट करत काँग्रेसवर टीका केली. ते म्हणाले, अनेक वर्षांपासून राहुल गांधी देशभरात यात्रा करून देशातील लोकशाही धोक्यात असल्याचे सांगत आहेत. ईव्हीएमवर विश्वास नसल्याचे सांगून आपल्या यंत्रणांवर ते अविश्वास व्यक्त करतात. पण कर्नाटकाने वेगळीच कहाणी सांगितली आहे.

## पाईपलाईनमधील गळतीमुळे दूषित पाणी
# इंदूरमध्ये घातक जिवाणूमुळे १५ लोकांचा मृत्यू
## मानवाधिकार आयोगाने अहवाल मागवला

**इंदूर/वृत्तसंस्था :** इंदूरमधील भागीरथपुरा येथे १५ लोकांचा जीव दूषित पाण्यामुळेच गेला आहे. याची पुष्टी गुरुवारी महात्मा गांधी मेमोरियल मेडिकल कॉलेजच्या लॅब रिपोर्टमधून झाली. उचक्ज डॉ. माधव हसानी म्हणाले - नमुन्यांच्या तपासणी अहवालात स्पष्टपणे पुष्टी झाली आहे की दूषित पाणी प्यायल्यानेच लोक आजारी पडले आणि त्यांचा जीव गेला.

जिल्हाधिकारी शिवम वर्मा यांचे म्हणणे आहे की, सविस्तर अहवालाची प्रतीक्षा आहे. मेडिकल कॉलेजमध्ये कल्चर टेस्टही केली जात आहे. याचा अहवाल आल्यानंतरच काही बोलणे योग्य ठरेल.

तर, नगरविकास मंत्री कैलाश विजयवर्गीय यांनीही मान्य केले की, भागीरथपुरा येथील पिण्याच्या पाण्यात सांडपाणी मिसळल्याने परिस्थिती बिघडली आहे. ते म्हणाले - मला वाटते की चौकीजवळ जी गळतीची जागा आहे, तीच याची सर्वात प्रमुख शक्यता आहे.

दुसरीकडे, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने या प्रकरणाची दखल घेतली आहे. आयोगाने मध्य प्रदेश सरकारच्या मुख्य सचिवांना नोटीस बजावून दोन आठवड्यांच्या आत सविस्तर अहवाल देण्यास सांगितले आहे.

या मुद्द्यावर आज उच्च न्यायालयातही दुपारी १२ वाजल्यानंतर सुनावणी होऊ शकते. जबलपूरची दोन सदस्यीय खंडपीठ ऑनलाइन सुनावणी करेल. न्यायालयाने सरकारकडून स्टेटस रिपोर्ट मागवला आहे.

भागीरथपुरा येथील चौकीजवळ बांधलेल्या शौचालयाच्या खालून गेलेल्या पाइपलाइनमध्ये गळती



आढळली आहे. त्याची दुरुस्ती केली जात आहे.

भागीरथपुरा येथील चौकीजवळ बांधलेल्या शौचालयाच्या खालून गेलेल्या पाइपलाइनमध्ये गळती आढळली आहे. त्याची दुरुस्ती केली जात आहे.

तज्ञांच्या मते, दूषित पाणी म्हणजे त्यात जीवाणू असणे, परंतु कोणत्या जीवाणूंनी प्रभावित केले, यासाठी विशेष (कल्चर) तपासणी केली जाते. गटाराच्या पाण्यात अनेक प्रकारचे घटक असतात. यात शौचालयातून बाहेर पडणारे मल-मूत्र, बाथरूममधील आंघोळीचे, कपडे धुण्याचे साबण, पावडरचे पाणी देखील असते.

याशिवाय भांडी धुण्याचे साबण, पावडर, फरशी साफ करण्याचे लिक्विड, केमिकल देखील असते. हा सर्व कचरा ड्रेनेजमध्ये मिसळतो. अशाच क्षेत्रात जर व्यावसायिक ठिकाणी केमिकल संबंधित कचरा असेल तर हे सर्व मिसळून घातक बनतात. मग जर हे पिण्याच्या पाण्याच्या लाईनमध्ये मिसळले तर ते आणखी विषारी होतात.

## मतदान हे 'राष्ट्रीय कर्तव्य'; लोकशाही बळकट करण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा - मनपा आयुक्त श्रीमती मानसी

**लातूर/प्रतिनिधी :** मतदानाचा दिवस हा केवळ सुट्टी म्हणून मौजमजा करण्याचा दिवस नसून, तो एक राष्ट्रीय उत्सव म्हणून आपले कर्तव्य पार पाडण्याचा दिवस आहे. लोकशाहीची पाळेमुळे अधिक घट्ट करण्यासाठी तरुण वर्गामध्ये मतदान करण्याची 'क्रेझ' निर्माण झाली पाहिजे, असे परखड प्रतिपादन लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रीमती मानसी यांनी केले.

लातूर शहर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२५-२०२६ च्या पार्श्वभूमीवर, दयानंद कला महाविद्यालय येथे 'स्वीप' (SVEEP) अंतर्गत आयोजित मतदान जनजागृती अभियानात त्या मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड





यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना श्रीमती मानसी यांनी मतदारांमधील उदासीनता दूर करण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या की, केवळ सुट्टीचा आनंद घेण्यापेक्षा लोकशाही प्रक्रियेत सहभाग नोंदवणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः मतदान करण्यासोबतच आपल्या घरातील आणि परिसरातील सर्व पात्र मतदारांना मतदानासाठी प्रवृत्त करून एक सजग नागरिक म्हणून आपली भूमिका बजावावी.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी सांगितले की, तरुणांनी मतदान प्रक्रियेत केवळ मतदार म्हणून नव्हे, तर सक्रिय घटक म्हणून सहभागी होऊन राष्ट्रीय विकासामध्ये आपला मोलाचा हातभार लावणे आवश्यक आहे.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे मतदान जनजागृती करण्यासाठी उभारलेला सेल्फी पॉईंट व कलेच्या माध्यमातून झालेली जनजागृती. राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त डॉ. संदिपान जगदाळे व महाविद्यालयातील संगीत व नाट्य विभागातील प्राध्यापकांच्या चमूने पोवाड्याचे सादरीकरण केले, तर मनपा शाळा क्रमांक सहाच्या विद्यार्थ्यांनी बहारदार भारूडा सादर करून मतदानाचे महत्त्व पटवून दिले. या सांस्कृतिक सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

या अभियानास मनपा अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मनपा शिक्षणाधिकारी श्वेता नागणे, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित आणि प्रा. डॉ. शिवकुमार राऊतराव, सतीश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. दशरथ ननवरे यांनी केले, तर आभार श्री. मधुकर ढमाले यांनी मानले.

## माझं घर प्रकल्पात महात्मा फुले यांच्या पुतळ्याचे शनिवारी अनावरण

**लातूर/प्रतिनिधी :** थोर समाजसुधारक, शिक्षणमहर्षी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण सोहळा माणूस प्रतिष्ठान संचालित माझं घर प्रकल्प, बुधोडा येथे आयोजित करण्यात आले आहे. हा सोहळा शनिवार (जाने ३) रोजी दुपारी ३ वाजता विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

बहुजन उद्धारक महात्मा जोतीराव फुले हे थोर समाजसुधारक व शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. त्यांनी स्त्री शिक्षण, सामाजिक समता आणि अस्पृश्यता निवारणासाठी मोलाचे कार्य केले. त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी व तरुणांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने माझं घर येथे महात्मा जोतीराव फुले यांचा अर्धाकृती पुतळा उभारण्यात येत आहे. ३ जानेवारी हा सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिवस आहे. सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या शिक्षिका व समाजसुधारिका होत्या. त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून महात्मा जोतीराव फुले यांच्या पुतळ्याचे अनावरण प्रमुख मान्यवरांच्या उपस्थिती



होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्योतिर्मय सावित्री या पुस्तकाच्या लेखिका तथा साहित्यिक अरुणा दिवेगावकर राहणार असून पुतळ्याचे अनावरण महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांच्या हस्ते होणार आहे.

कार्यक्रमास प्रमोद (बाबा) झिंजाडे, (बार्शी), राजेंद्र कासार ( पुणे), संध्याताई बारगजे (बीड), हरिश्चंद्र सुडे (लातूर), अँड शोभाताई गोमारे, डॉ. निता मस्के-पाटील, डॉ. निलम पन्हाळे, प्रा. सुशिला पिंपळे-नारनावरे, मायाताई सोरटे, रंजना चव्हाण, रंजनाताई हासुरे आदि मान्यवरांची प्रमुख उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजन समितीच्यावतीने शरद झरे, संगीता झरे, दगडूसाहेब पडिले, बालासाहेब यादव,.सतिष सोनकांबळे, पांडूरंग जाधव, सुनिल हेंगणे, गणपतराव पाटील, रफि पटेल, सय्यद रहेमान, प्रा. कपिल शेवाळे, प्रा. सुनिल गुरनाळे, प्रा. संतोष बडूरकर, लिंबराज बिरादार, पांडूरंग मोरे, बस्वराज अष्टुरे, विक्रांत शंके, श्रीनिवास बडूरे, संतोष साखरे, हरेश्वर करंडे यांनी केले आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**कृत्रिम बुद्धिमत्ता ही भारताचा विकासरथ-राष्ट्रपती**

## चिमटा दयाचा



लातूर शहरात रिंगरोडवर सतत अपघात होत आहेत! अपघात रोखण्यासाठी मजबुत प्रयत्नाची गरज आहे!! त्याच-त्या ठिकाणी अपघात होतात तरी दुर्लक्षेचा परिणाम दिसून येत आहे!!!

## लातूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपात असंतोष; निष्ठावंत कार्यकर्त्यांचे बंड उफाळले

### लातूर भाजपात उमेदवारीवरून भडका; बंडखोर उमेदवार आखाडा पेटविणार

**लातूर/प्रतिनिधी :** महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर भारतीय जनता पक्षात असंतोष उफाळून आला आहे. उमेदवारी वाटपावरून निष्ठावंत कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. औसा रोडवरील कल्पतरू मंगल कार्यालयात नाराज व तिकीटापासून वंचित राहिलेल्या कार्यकर्त्यांची बैठक झाली, यावेळी अनेक निष्ठावंतानी पक्षातील घडामोडींवर खुल्या मनाने चर्चा केली. काही कार्यकर्त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवून निष्ठावंत भाजपा किंवा नमो आघाडीच्या नावाने एकत्र येण्याची भूमिका व्यक्त केली आहे.

या बैठकीत काही कार्यकर्त्यांनी उमेदवारी प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत अन्याय झाल्याचा आरोप केला. निवडणूक प्रभारी आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या भूमिकेबाबतही जाहीर असंतोष व्यक्त करण्यात आला. तथापि, हे आरोप कार्यकर्त्यांच्या



### महानगरपालिका रणसंग्राम

भावना म्हणून मांडले गेले असून, त्याबाबत पक्ष किंवा संबंधितांकडून अधिकृत प्रतिक्रिया अद्याप मिळालेली नाही.



बैठकीत अनेक प्रभाग मध्ये नाराज कार्यकर्ते स्वतंत्र गट म्हणून निवडणूक लढवण्याच्या तयारीत असल्याची माहिती देण्यात आली. काही कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, त्यांनी वर्षानुवर्षे पक्षासाठी काम केले, मात्र उमेदवारीत त्यांना न्याय मिळाला नाही. दुसरीकडे, पक्षाच्या निवडणूक व्यवस्थेतील निर्णय ही संघटनात्मक प्रक्रिया असल्याचे मत काही वरिष्ठ कार्यकर्त्यांनी व्यक्त केले आहे.

या घडामोडींमुळे भाजपात अंतर्गत असंतोषाचा सूर आला असून, त्याचा निवडणूक लढतीवर कितपत परिणाम होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पक्षात चर्चा, समन्वय आणि समन्वय साधण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही समजते. आगामी काही दिवसांतील राजकीय हालचालींनंतर परिस्थिती अधिक स्पष्ट होईल. बंडखोर कोणती भूमिका घेणार हे अजून कळाले नाही. याचा फटका भाजपाला बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. निष्ठावंत चांगलेच पेटून उठले आहेत. जाहिर गैरप्रकाराचा आरोप केला जात आहे. हे भाजपासाठी किती योग्य का अयोग्य आहे याचा विचार पक्षश्रेष्ठींनी करण्याची गरज आहे.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## कार्यकर्त्याच्या नाराजीचा परिणाम होणार

राज्यातील २९ महानगरपालिकेच्या निवडणुकीत इच्छुक उमेदवाराची नाराजकी भोवणार आहे. अनेक दिग्गजांना डावलुन नव-तरुणांना उमेदवारी दिली आहे. अनेकांना धक्कातंत्राचा अनुभव आला आहे. पुणे, छत्रपती संभाजीनगर आदि ठिकाणी कार्यकर्त्याचा उद्रेक दिसुन आला आहे. जुने अनेकवर्ष नगरसेवक राहीलेल्यांना यावेळी उमेदवारी दिली नाही. निष्ठावंताना डावलले आहे. त्याच प्रमाणे निवडणुकीत जी खेळी खेळली जाते तीही खेळली गेली आहे. मुळात राजकारणात सर्व खरे बोलतात असे नाही. निवडणुकीच्या काळात तर सर्वांना खुश ठेवावे लागते. कार्यकर्ते नाराज करून चालत नाहीत. त्यात बंडखोरी झाली तर कोणत्याही पक्षाला मोठी किंमत मोजावी लागते. मात्र यावेळी पक्षाला बंडखोरीचा परिणाम भोगावा लागणार आहे. निवडणुकीच्या तोंडावर अनेकांनी पक्षांतर केले आहे. आपल्या मागे किती कार्यकर्ते आहेत. आपण मोठे कार्यकर्ते आहोत याचे भान न ठेवता पक्ष बदलला आहे. त्यामुळे पक्षाप्रमुख नेत्यांसमोर एक मोठे आव्हान उभे राहीले आहे. अनेक ठिकाणी पक्षांतर केले आहे. वास्तविक भाजपामधून राष्ट्रवादीत गेले, काँग्रेसमध्ये गेले. काँग्रेसचे राष्ट्रवादीत गेले म्हणून निवडणुक काळात फारसा फरक पडेल असे वाटत नाही. काँग्रेसच्या जीवावर मोठे झालेले व मोठी पद भोगलेले राष्ट्रवादीत जाणे म्हणजे स्वार्थायाठीचा हा निर्णय असू शकतो. तसे राष्ट्रवादी अजित पवार गट, किंवा एकनाथ शिंदे गट मधील स्वतंत्र लढलेले विजयी महानगरपालिकेचे नगरसेवक पुन्हा एकत्र येण्याची शक्यता नाकारता येत नाही. बऱ्याच वेळा निवडणुकीनंतर आघाडी व युती झालेली आहे. केवळ महा शब्द लावला जातो. स्वतंत्र लढायाचे, ताकद आजमावयाची नंतर दोघे भाऊ-भाऊ म्हणून नांदायाचे हे आज पर्यंत पाहात आलो आहोत. त्यामुळे जनतेला मुर्ख बनविले का? किंवा नाही काही फरक पडत नसतो. त्यामुळे  सध्याला काय दिसून येत आहे तर बंडखोरी होणार! हे निश्चित मात्र बंडखोरांना शांत करण्याची चावी सुद्धा नेत्याच्या हाती असते हे विसरून चालणार नाही. त्यामुळे सध्याला जे जनतेला दिसून येत आहे ते निवडणुकीपुरते आहे हे लक्षात घेतले पाहिजे. निवडणुक काळात सर्वांनाचा उमेदवारी मिळावी अशी अपेक्षा कार्यकर्त्यांत असणे स्वाभाविक आहे. नेते सुद्धा वार्डात किंवा प्रभागात किती सक्रिय होते, याचा अंदाज दोन महिण्यापासून घेतला जात असावा. निवडणुक कधीही लागू शकते याचा अंदाज असल्याने अगोदरच उमेदवार ठरलेले असतात. याची वाच्यता बाहेर होत नाही. एवढेच शिल्लक असते. त्यामुळे निवडणुकीत सर्वांना खुश करणे आवघड असते. यावेळी काँग्रेस, भाजपा, राष्ट्रवादीकडे उमेदवारी मागणारे भरपूर दिसून आले. जो पक्ष सत्तेत असतो त्या पक्षाकडे उमेदवारी मागीतली जाते. असे जरी असले तरी जे बंडखोरीचे वादळ उठले आहे ते शांत करणे आवघड दिसून येत आहे. एकतर अनेकांनी पक्षांतर केले आहे त्यांना मतदार स्विकारतील का? नवखे धनाच्या जोरावर उमेदवारी दिली आहे त्यांना सुद्धा मतदार स्विकारतीलच असे नाही. मतदार आता हुशार झाला आहे. अभ्यासपुर्वक मतदान होण्याची शक्यता आहे. शहरातील मतदार आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. मोठ्या शहरात बंडखोरी अटळ असून यावर कशा प्रकारे मात करावयाची आहे हे एक संकट नेत्यासमोर उभा राहीले असले तरी अनेकांना स्विकृत सदस्य म्हणून घेण्याचे आश्वासन दिले जाणार आहे.  यावेळी महानगरपालिका निवडणुक जाहिर होण्यापुर्वी ज्या घडामोडी झाल्या त्या आश्चर्यकारक ठरणाऱ्या होत्या. दोन ठाकरे बंधु एकत्र आले. महायुती किंवा महाआघाडीत बिघाडी झाली. राज्यातील नगरपरिषदेत मुख्यमंत्र्यांनी बाजी मारली आहे. तसेच याही महानगरपालिकेच्या मतदानपुर्वी काही तरी वेगळे घडण्याची शक्यता नाकारता येणार नाही. लाडक्या बहिणीची साथ मिळविण्यासाठी मोठा प्रयत्न होण्याची शक्यता आहे. आता पर्यंत जी सत्ताधाऱ्यास यश मिळाले आहे ती लाडक्या बहिणीचा मोठा हिस्सा आहे. हे उघउ अनेकांना कळून आले आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यास तारणारी व संकट काळात धाऊन येणारी योजनाच साथ देण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सत्ताधाऱ्यासमोर बंडखोरीचे संकट उभा राहीले तरी फारसा फरक पडणार नाही. अधिक काही पक्षविरोधी काम केल्यास अनेकांना बाहेरचा रस्ता दाखविला जातो किंवा चौकशीला सामोरे जावे लागेत हे निश्चित असते! त्यामुळे अजून अंतिम यादी जाहिर महानगरपालिकेनी जाहिर केली नाही. अनेकांनी उमेदवारी दाखल केली तरी यातून परत घेणारे किती आहेत. त्यानंतर जी यादी निश्चित होईल. तो पर्यंत केवळ वाट पाहाण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. काँग्रेस व भाजपामधुन बाहेर पडलेले त्यांना राष्ट्रवादीने सामाऊन घेतल्याचे दिसून येत आहेत. जे आलेले आहे त्यांना जनता मतदार स्विकारणार का? जर जनतेनी स्विकारले तर पक्ष बदलणारे हे मातब्बर होते असे समजणे चुकीचे नाही. त्यामुळे राज्यातील ही महानगरपालिकेची निवडणुक नेत्यासाठी त्रासदायक ठरणारी असणार आहे. जागा कमी व उत्स्युकांची संख्या अधिक झाली आहे. महानगरपालिकेची निवडणुकीत प्रभाग मोठे आहेत, त्याच प्रमाणे तीघें किंवा चारजणाचा एक प्रभाग असल्याने जनतेनी कामासाठी कोणाकडे जावे हा मोठा प्रश्न मतदार नागरिकासमोर उभा राहाणार आहे. गत वेळी आम्हाला तुम्ही मत दिले का? असे सर्रास बोलून दुसऱ्या नगरसवेकाकडे पाठविले जात होते. मुळात आपल्या प्रभागतील उमेदवार असेल ठिक, नसता दुसऱ्या प्रभागातील उमेदवार अनेक ठिकाणी लादले जाण्याची शक्यता आहे. सुरक्षित वार्डा कोणता आहे याचा शोध घेऊन पावले उचलली जाणार आहेत. बऱ्याच ठिकाणी आपल्या वार्डात न राहाणारा शेजाराच्या वार्डातील नागरिकांना उमेवारी दिली गेल्याने जनता त्यांना स्विकारले का? याचा विचार नेत्यांनी केला पाहिजे. नागरिक यावेळी आपल्या वार्डातील किंवा प्रभागातील आहे का? याचा विचारकरून मत देण्याची शक्यता आहे. मतदार आता पुर्वीसारखा राहिला नाही. विचारपुर्वक मतदान करणार आहे. त्यामुळे रणछोडदासांना जिंकून आले तरी कामे करावीच लागणार आहे. सध्याला नेते मंडळी बंडखोरीस तोंड कसे देतील हे पाहाणे औचित्याचे ठरणारे आहे.

## चेहऱ्याची त्वचा नितळ आणि मऊ बनवण्यासाठी

# ट्राय करा 'हे' घरगुती फेस मास्क



अलीकडे लोकांना सतत काम, कॉलेज किंवा इतर कारणांमुळे चेहऱ्यावर निस्तेजपणा, त्वचेवर घाण साचणे आणि त्वचेशी संबंधित इतर समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. अशा परिस्थितीत, लोकांना रात्री झोपण्यापूर्वी त्यांच्या त्वचेची काळजी घेण्याचा आणि ती स्वच्छ आणि मॉइश्चरायझ करण्याचा सल्ला दिला जातो.

त्वचा निरोगी, चमकदार आणि मॉइश्चरायझ ठेवण्यासाठी रात्रीच्या वेळी फेस मास्कसुद्धा लावता येतो. परंतु केमिकलयुक्त फेसमास्क लावण्याऐवजी तुम्ही घरातच केमिकल फ्री फेस मास्क बनवू शकता. चला जाणून घेऊया हे फेस मास्क कोणते आहेत..

कोरफड आणि मधाचा फेस मास्क–

कोरफड आणि मध दोन्ही नैसर्गिकरित्या निरोगी त्वचा राखण्यासाठी फायदेशीर आहेत. कोरफडमध्ये अँटीऑक्सिडंट,अँटी बॅक्टेरियल आणि अँटी इन्फ्लीमेंट्री गुणधर्म असतात. तर मधात अँटी इन्फ्लीमेंट्री, अँटी बॅक्टेरियल आणि मॉइश्चरायझिंग गुणधर्म असतात. १ चमचा कोरफड जेल आणि २ चमचे मध मिसळून पेस्ट तयार करा. झोपण्यापूर्वी या पेस्टचा पातळ थर चेहऱ्यावर लावा. सकाळी चेहरा धुवा. तुम्हाला लगेच फरक जाणवेल.


गुलाबाच्या पाकळ्यांचा फेस मास्क–

गुलाब हे त्वचेसाठी सर्वात फायदेशीर फुलांपैकी एक आहे. गुलाब तुमच्या त्वचेसाठी चमत्कारिक ठरू शकतो. गुलाबामध्ये असे गुणधर्म आहेत जे तुमची त्वचा मऊ आणि गुळगुळीत करण्यास मदत करतात. तुमच्या चेहऱ्यावर नियमितपणे गुलाबाच्या पाकळ्यांचा फेस मास्क लावल्याने तुमच्या त्वचेची नैसर्गिक चमक टिकून राहण्यास मदत होईल.

ओटमील आणि मधाचा फेस मास्क–

चेहऱ्याचा निस्तेजपणा कमी करण्यासाठी आणि निरोगी आणि तरुण त्वचा मिळवसाठी ओटमील आणि मधाचा फेस मास्क उत्तम आहे. मधात अनेक मॉइश्चरायझिंग आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात आणि त्यात अनेक पोषक तत्वे देखील असतात. ओटमील आणि मध पूर्णपणे मिसळून पेस्ट तयार करा. ओटमील आणि मधाच्या पेस्टचा पातळ थर चेहऱ्यावर लावा. सकाळी चेहरा स्वच्छ धुवा.

# नवीन वर्षात वजन कमी करायचे आहे? मग आजपासून 'हे' पदार्थ खाणे टाळा



प्रत्येकाला वजन कमी करायचे असते, पण प्रत्यक्षात किती जण हे साध्य करतात असा प्रश्न पडतो. वजन कमी करण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतात, पण त्याहूनही अधिक मनावर ताबा ठेवावा लागतो. नाहीतर, वजन कमी करण्याची इच्छा काही दिवसांतच नाहीशी होईल. वजन कमी करणे ही वेगाने होणारी प्रक्रिया नाही. त्यासाठी बराच वेळ लागतो. तुम्ही तुमच्या व्यायामासोबतच आहारात काही बदल केल्यास हे सहज शक्य होते. आज आपण वजन कमी करण्यासाठी कोणत्या पदार्थांपासून दूर राहायचे जाणून घेऊया.

**गोड पेये**

बाजारात मिळणारे सॉफ्ट ड्रिंक्स, सोडा, डाएट ड्रिंक्स, चहा किंवा एनर्जी ड्रिंक सर्व वजन वाढवणारी पेये आहेत. ही पेये केवळ वजन वाढवत नाहीत तर अनेक आजारांनाही कारणीभूत ठरतात. म्हणून हे सेवन करणे टाळा.

**इन्स्टंट नूडल्स–**

चायनीज नूडल्स किंवा रिफाइंड मैद्यापासून बनवलेले काहीही तुमचे वजन कमी करण्यास मदत करणार नाही. म्हणून भाकरी, चिला इत्यादी संपूर्ण धान्यापासून बनवलेले पदार्थ खा.

**प्रक्रिया केलेले चीज–**

बाजारात मिळणारे बटर आणि चीज किंवा पिझ्झा आणि बर्गरमध्ये मिळणारे पदार्थ टाळा. या गोष्टी वजन वाढवतात.

**उच्च–कॅलरीयुक्त पदार्थ**

लाल मांस, दुग्धजन्य पदार्थ आणि इतर अनेक पदार्थ हे सर्व उच्च–कॅलरीयुक्त पदार्थ आहेत. ते खाणे टाळा त्याऐवजी, भरपूर हिरव्या पालेभाज्या आणि ताजी फळे खा. डाळी आणि बीन्सदेखील वजन कमी करण्यास खूप उपयुक्त आहेत. हे टाळण्याव्यतिरिक्त, नियमित व्यायाम, पुरेसे पाणी आणि पुरेशी झोप देखील आवश्यक आहे.

**चुकीचा नाश्ता–**

जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर गोड पदार्थ असलेले धान्य टाळा. नाश्त्यासाठी, रिफाइंड पीठ, रव्याची खीर इत्यादीपासून बनवलेले पदार्थ टाळा, संपूर्ण धान्य, ओट्स इत्यादी निवडा.

**फ्लेवर्ड ताक–**

बाजारात तुम्हाला असे ताक मिळेल ज्यामध्ये विविध चवीचे मिश्रण असते. त्यात साखर देखील असते. हे घटक टाळा.

**गोड दूध–**

बाजारात मिळणारे गोड दूध किंवा बाहेरून आणलेले दूध पिऊ नका, त्यात साखरेचे प्रमाण जास्त असते ज्यामुळे वजन वाढते.

# कॅन्सर–डायबिटीससारखे आजार दूर ठेवते ड्रॅगन फ्रुट, जाणून घ्या सेवन करण्याचे फायदे



ड्रॅगन फ्रूट,फक्त त्याच्या सुंदर रंग आणि चवीसाठीच ओळखले जात नाही, तर ते आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. हे कमी कॅलरीज असलेले फळ आहे जे पोषक तत्वांनी आणि अँटिऑक्सिडंट्सने भरलेले आहे.

त्यात फायबर, व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि लोह यासारखे अनेक आवश्यक पोषक तत्व असतात. त्यामुळे त्याला एक सुपरफूड म्हटले जाते. आज आपण ड्रॅगन फ्रुट खाण्याचे आश्चर्यकारक आरोग्य फायदे जाणून घेऊया.

**वजन कमी करण्यास फायदेशीर–**

ड्रॅगन फ्रुटमध्ये कमी कॅलरी आणि उच्च फायबर असते. त्यामुळे तुम्हाला बराच काळ पोट भरल्यासारखे वाटते. ज्यामुळे तुमची भूक कमी होते आणि वजन नियंत्रणात राहते.

**त्वचा चमकदार बनते–**

ड्रॅगन फ्रूटमध्ये असलेले व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स निरोगी आणि चमकदार त्वचा राखण्यास मदत करतात. ते सुरकुत्या आणि बारीक रेषा कमी करण्यास देखील मदत करते.

**डायबिटीसमध्ये उपयुक्त–**

ड्रॅगन फ्रुटचा कमी ग्लायसेमिक इंडेक्स रक्तातील साखरेची पातळी वेगाने वाढण्यापासून रोखतो.ज्यामुळे ते मधुमेहींसाठी फायदेशीर ठरते.

**हृदयाचे आरोग्य सुधारते–**

ड्रॅगन फ्रूटमध्ये मोनोअनसॅच्युरेटेड फॅट असते. जे कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित करण्यास मदत करते आणि हृदयरोगाचा धोका कमी करते.

**कॅन्सरपासून बचाव करते–**

ड्रॅगन फ्रूटमध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि फ्लेव्होनॉइड्स असतात. जे फ्री रॅडिकल्सशी लढण्यास आणि कॅन्सरच्या पेशींच्या वाढीस प्रतिबंध करण्यास मदत करतात.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढवते–**

ड्रॅगन फ्रूटमधील व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात आणि सर्दी आणि फ्लूसारख्या समस्या टाळण्यास मदत करतात. त्यामुळे हे फळ खाल्ल्यास हंगामी आजारांपासून दूर राहण्यास मदत मिळते.

**हाडे मजबूत करते–**

ड्रॅगन फ्रूटमध्ये कॅल्शियम आणि मॅग्नेशियम असते. जे हाडे मजबूत करते आणि ऑस्टियोपोरोसिससारख्या समस्या टाळते.

## प्राण्यांनाही भावभावना असतात?

प्राण्यांनाही भावभावना असतात का? हा एक संशोधनाचा विषय. तसं पाहिल्यास आजची मंडळी ही याबाबत विचारच करीत नाहीत. विचार करीत नाहीत की त्यांना भावभावना असतात. तसं पाहिल्यास आज त्याबद्दल विचार करायला आपल्याजवळ वेळच नाही. अन् त्याबाबत कोणी विचारही करीत नाही.

प्राण्यांनाही भावभावना असतातच. कधी कुत्री आपल्याला मदत करीत असतात तर कधी मांजरी आपलं मनोरंजन करीत असतात. कधी घोडे आपली मदत करित असतात तर कधी गाढवही मदत करीत असतांना माणसांना. कोंबडे सकाळी उठविण्याचे काम करतात तर मेंढी व बकरी आपल्याला लेंडी खत देते. गाय दूध देते तर बैल शेतीकामात मदत करते. तरीही आपण त्यांचे उपकार विसरुन त्यांना कापून खातो. कारण आपण उपकार विसरणारे विषभोगी आहोत. उपकार जाणणारे अमृतभोगी नाही.

प्राण्यांनाही भावभावना असतातच. याबाबतीत एक प्रसंग सांगतोय. एका व्यक्तीनं एक मांजर टाळली होती. त्यानं एकदा एका मांजरीला धाक दाखवला. तेव्हा त्या मांजरीला राग आला व तिनं त्याच्या गाडीची शिट फाडली. त्या मांजरीनं एवढंच केलं नाही तर तिला त्याचा एवढा राग आला की ती त्याच्या घरात येत नव्हती. बराच वेळ ती बाहेर राहिली. त्यानंतर ती घरात आली, तेही भीत भीतच. अन् ती घरात आली. तेव्हा ना दोन दिवस ती सोप्यावर झोपली ना ती अंथरुणावर झोपली.

एक पाळलेली मांजर. जी एका व्यक्तीची लाडाची. जी अंथरुणावर झोपत होती त्यांच्या. जी सोप्यावर झोपत होती त्यांच्या. जी अन्न खात होती पुरेसे. म्याव म्याव करुन दूध मागत होती दररोज. तिने मांजरीने दोन दिवस अन्नही खाल्लं नाही आणि दूधही मागितले नाही. एक मांजर, जी मुके जनावर आहे व आपण तिला मुकंच जनावर समजतो. तीच मांजर. तीच मांजर एक दिवस जेवत नाही. तिला राग आल्यासारखा ती गाडीचे शिटकव्हर फाडते. ती घरात येत नाही बराच वेळ. जी झोपत नाही अंथरुणावर, सोप्यावर. यावरुन आपल्याला प्रत्यय येतो. प्रत्यय येतो की मांजर हा मुका प्राणी असूनही त्यालाही भाव

भावना आहेतच. अशाच भावभावना इतर प्राण्यांना नसाव्यात काय? याबाबतीत विचार करतांना एक आणखी प्रसंग सांगतोय. या प्रसंगात त्या एका गावातील प्रसंग सांगतोय. वर्धा जिल्ह्यातील ते एक गाव. गावात माकडं भरपूर आहेत व त्या गावातील माकडं शेतातील रस्त्यातून घरी येतांना लोकांना पकडतात व त्यांच्या कानशिलात दोन चार झापडा मारतात. एकदा तर एका माकडानं एका महिलेच्या छातीवर बसून तिच्या कानशिलात मारलं होतं. ज्यातून तिला दुखापत झाली होती व तिला जवळच असलेल्या वर्धेतील सेवाग्राम रुग्णालयात भरती केले होते. कारण दुखापतीने ती घाबरली होती. आपण जेव्हा समुहात असतो आणि समुहात आपण प्राण्यांची छेड काढत असतो. तेव्हा हे प्राणी आपला कुन्हा पकडून ठेवतात. ज्याची परियंती ते प्राणी आपण एकटे असल्यास आपल्याला झापड मारुन काढतात.

प्राणी आपल्याला संकटातून वाचवतातही. ते आपल्याला समजून येत नाही. एखाद्यावेळेस एखाद्या प्रवासात आपण असलो तर एखादा प्राणी मधातच रस्त्यावर येतो व आपली गाडी अडवतो. त्यामुळंच काही वेळ आपल्याला थांबावे लागते. आपल्याला आपल्या मार्गात अचानक आलेल्या अशा प्राण्यांचा राग येतो. परंतु नंतर आपल्याला कळतं की पुढे आपल्याला अपघात होणार होता. जेव्हा एखादा अपघात झालेला दिसतो वा एखादं झाड पडलेलं दिसतं. कधी भुस्खलन झालेलं दिसतं व वाटतं की बरं झालं ते प्राणी मधात आलं व आपण थांबलो. नाहीतर या अपघातात आपणही गेलो असतो. कदाचीत ते झाड पडण्याची वेळ वा भुस्खलन होण्याची वेळ व आपली गाडी जाण्याची वेळ ही सारखीच असते. ते त्या प्राण्यांना माहीत असतं. परंतु आपले कर्म चांगले असतात. म्हणूनच आपण वाचतो. अनेक प्राण्यांबाबतचे अनुभव. अनेक प्रसंगात आपल्याला येत असतात. कधी वाटत असतं की हे प्राणी बरोबर नाही. त्यांचा राग येत असतो आपल्याला. परंतु त्या प्राण्यांचा जेव्हा उपयोग आपल्याला कळतो. तेव्हा मात्र त्या प्राण्यांबाबत आपल्यात सहानुभूती निर्माण होत असते. एक असाच प्रसंग. एक वाशीमचा मित्र. तो पेंटींगचं काम करायचा. त्याही दिवशी तो पेंटींग करीत होता. झुल्यावर होता. तेव्हा अचानक एका कावळ्यानं त्याचेवर हल्ला केला व त्याच्या आक्रमणापासून स्वत:ला वाचविण्यासाठी तो सज्जावर उतरला. डोळे कुस्करून कावळ्याचा प्रतिकार करण्यासाठी सज्ज झाला. तोच झुला तुटून खाली पडला व त्याला कळलं की त्या कावळ्यानं त्याचेवर हमला करुन सज्जावर उतरण्यास भाग पाडलं होतं. म्हणूनच त्याचा जीव वाचला. त्यानं मनोमन कावळ्याचे उपकार मानले. आता तो पक्षी प्रेमी व प्राणी प्रेमी बनलेला आहे व तो दर उन्हाळ्यात सर्वच पक्षीच नाही तर प्राण्यांसाठीही आपल्या स्वखर्चातून वाशीममध्ये पाण्याची सोय करतो. एक असाच प्रसंग. फेसबुकवर आलेला व्हिडिओ. बिचारी गाय एका मुलाला तोंडात पकडून ओढत नेते. सुरुवातीला तिचा राग येतो आपल्याला, ती करीत असलेल्या कृत्याचा. परंतु नंतर भींत पडते. तेव्हा कळतं की तिनं केलेलं कृत्य बरोबर होतं. बिचाऱ्या गाईने बाळाला वाचवले.

प्राण्यांच्या उपकाराबाबत सांगतांना प्राणी आपल्या बऱ्याच उपयोगाचे आहेत. परंतु आपण त्यांचे महत्व जाणून घेत नाही. फक्त स्वार्थासाठीच तेवढा आपण धापर करतो. प्राणी आपल्या उपयोगाचे आहेत. हे पुराणही सांगतं. हल्दिघाटच्या लढाईत महाराणा प्रतापच्या कामात येणारा चेतक, तसाच झाशीची राणी लक्ष्मीबाईच्या कामात येणारा अश्व, तसाच रामायणातील सीतेला वाचविणारा जटायू. ही त्या प्राण्यांची उदाहरणं आहेत की ज्यांनी आपल्या मैत्रीसाठी वा धन्यासाठी आपल्या प्राणाची बाजी लावली. आजही आपल्याला आपली गाय दूध देवून मदत करते. बैल शेतात अंगमेहनत करुन आपल्या कामास येतो. कुत्रा घराची राखण करतो. अन् बिभट्या जरी दिसला तरी तो न घाबरता आपल्या प्राणाची बाजी लावतो. परंतु आपल्या धन्याला काही होवू देत नाही. प्राणी आपलं मरण पत्करतात. परंतु आपल्याला क्षती पोहोचू देत नाहीत. आज आपल्याला माहीतही आहे की प्राणी माणसांपेक्षाही इमानदार व कर्तव्यदक्ष आहेत. परंतु आपली मानसिकता तशा स्वरुपाची नाही. आपली मानसिकता त्यांना कर्तव्यदक्ष मानत नाही आणि आपण फक्त त्यांचा स्वार्थासाठीच वापर करतोय. आपला स्वार्थ संपला की आपण त्या प्राण्यांना विसरतो. जसं गाय भाकड होताच तिचे दूध देणे उपकार विसरुन तिला कसाबाला विकणे. बैल म्हातारा होताच त्याचा आपल्याला उपयोग नाही. हा विचार करुन त्याला कसाबाला विकणे. कुत्रा पिसाळला. म्हणून त्याचा उपचार न करता त्याला जंगलात नेवून सोडणे.

आपली ही कृती समर्थनीय नाही. कारण आपल्याला जो मदत करतो, त्याचे उपकार विसरणं म्हणजे आपला स्वार्थीपणाचा कळसच झाला. हे असंच वागणे असल्यानं आता प्राणीही आपला बदला घेवू लागले आहेत. त्यांनाही समजले आहे की माणूस स्वार्थी आहे व हा स्वार्थी माणूस आपली मदत पुर्ण झाल्यावर आपल्यालाच कसाबाला विकतात. कोणी आपल्यालाच कापून आपल्याच मांसावर ताव मारतात. जसे कोंबडे पहाटेला बाक देवून आपल्याला उठवत आपल्याला शुद्ध ऑक्सिजन अर्थात ओझोन वायूचा फायदा मिळवून देतात. तरीही आपण ते उपकार न मानता त्यांनाच कापून त्यांच्याच मांसावर ताव मारतो. तेव्हा ते बदला घेण्यासाठी गावाकडे व गावातून शहराकडे येत आहेत. कधी ऐकायला मिळतं की गाईनं शिंग मारलं म्हणून दवाखान्यात गेला. कधी म्हटलं जातं की बिबट्या वा वाघ परीसरात सुटलाय. कधी म्हटले जाते की माकडानं हमला करुन जखमी केलं. ज्यातून भरती करावे लागले तर कधी म्हटले जाते की कातीचा कोंबडा उडाला व त्याने लोकांवर हमला करुन कितीतरी लोकांना जखमी केलं. तसंच कितीतरी प्रसंगात साप चावून माणसं मेल्याचीही उदाहरणे आहेत.

आज कधी कुत्री हमले करतात तर कधी मांजरीसारखी प्रजातीही हमला करते माणसांवर. कारण ते प्राणी मुकी जनावरं असली तरी त्यांनाही भावभावना आहेत की ज्यातून ते आता तशा स्वरुपानं वागू लागले आहेत माणसांसोबत. माणसांना अक्कल यावी म्हणून. आता पाहू या माणसांना भविष्यात किती अक्कल येते ते. जर अक्कल आली व माणसं सुधारली की पावलं असं म्हणता येईल. नाहीतर प्राणीही हमले नक्कीच करत राहणार यात शंका नाही. तेव्हा माणसानं सुधरावं. हिंसा करु नये. तसाच प्राण्यांचा स्वार्थासाठी ते उपयोग करु लागले तरी त्यांनी केलेले उपकार आपण विसरु नये म्हणजे झालं. कारण प्राण्यांनाही भावभावना असतातहे तेवढंच खरं आहे.

**–अंकुश शिंगाडे**
**नागपूर ९३७३३५९४५०**

## सुंदर आणि मऊ ओठा साठी

तुमचे ओठ सुंदर बनवण्यासाठी आतून हायड्रेट राहणे खूप महत्वाचे आहे. पाणी पिण्याने त्वचेच्या समस्याही दूर राहतात. तज्ञांच्या मते, तुम्ही दररोज सुमारे ३ लिटर पाणी प्यावे. जास्त पाणी पिल्यामुळे ओठ मुलायमदार राहण्यास मदत होते. बऱ्याच लोकांच्या ओठांवर काळे डाग तयार होतात. तज्ज्ञांच्या मते, कॉफी, चहा आणि वाइनसारख्या द्रवपदार्थांमुळे ओठ काळे होऊ शकतात. यामुळे हे काळे डाग टाळण्यासाठी तुम्ही स्ट्रॉची मदत घेऊ शकता.

तुमचे ओठ सुंदर बनवण्यासाठी आतून हायड्रेट राहणे खूप महत्वाचे आहे. पाणी पिण्याने त्वचेच्या समस्याही दूर राहतात. तज्ञांच्या मते, तुम्ही दररोज सुमारे ३ लिटर पाणी प्यावे. जास्त पाणी पिल्यामुळे ओठ मुलायमदार राहण्यास मदत होते.

तुमचे ओठ सुंदर बनवण्यासाठी आतून हायड्रेट राहणे खूप महत्वाचे आहे. पाणी पिण्याने त्वचेच्या समस्याही दूर राहतात. तज्ञांच्या मते, तुम्ही दररोज सुमारे ३ लिटर पाणी प्यावे. जास्त पाणी पिल्यामुळे ओठ मुलायमदार राहण्यास मदत होते.

बऱ्याच लोकांच्या ओठांवर काळे डाग तयार होतात. तज्ज्ञांच्या मते, कॉफी, चहा आणि वाइनसारख्या द्रवपदार्थांमुळे ओठ काळे होऊ शकतात. यामुळे हे काळे डाग टाळण्यासाठी तुम्ही स्ट्रॉची मदत घेऊ शकता.

बऱ्याच लोकांच्या ओठांवर काळे डाग तयार होतात. तज्ज्ञांच्या मते, कॉफी, चहा आणि वाइनसारख्या द्रवपदार्थांमुळे ओठ काळे होऊ शकतात. यामुळे हे काळे डाग टाळण्यासाठी तुम्ही स्ट्रॉची मदत घेऊ शकता.

ओठांवर घाण साचल्याने आणि त्यांची काळजी न घेतल्याने त्वचेवर मृत पेशी जमा होतात. ओठांचा रंग सुधारण्यासाठी घरी मध आणि ओट्सने स्क्रब करा. ओट्स मृत पेशी काढून टाकतील, तर मध ओठ मऊ करण्यास मदत करते.

ओठांवर घाण साचल्याने आणि त्यांची काळजी न घेतल्याने त्वचेवर मृत पेशी जमा होतात. ओठांचा रंग सुधारण्यासाठी घरी मध आणि ओट्सने स्क्रब करा. ओट्स मृत पेशी काढून टाकतील, तर मध ओठ मऊ करण्यास मदत करते.

काही महिला २४ तासांपैकी जवळपास १२ ते १३ तास ओठांवर लिपस्टिक ठेवतात. यामुळे ओठ खराब होण्यास सुरूवात होते. यामुळे नेहमीच ओठांवर लिपस्टिक लावताना थोडा विचार केला पाहिजे.

काही महिला २४ तासांपैकी जवळपास १२ ते १३ तास ओठांवर लिपस्टिक ठेवतात. यामुळे ओठ खराब होण्यास सुरूवात होते.




# कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात भारताचे वर्चस्व

समाज मनाचा कानोसा : सुरेश मुरलीधर कोडीतकर
मो. नं. ९५४५५२५३७५

येणारा काळ हा अर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या प्रभावाचा काळ असणार आहे. अर्टिफिशियल इंटेलिजन्सचे लघुरूप म्हणजे एआय होय.
अर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात एआयला मराठीत आपण कृत्रिम बुद्धिमत्ता असे म्हणतो. अर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि नवनवीन सॉफ्टवेअर यांची चाचणी घेणे हे जागतिक माहिती तंत्रज्ञान क्षेत्रापुढे एक फार मोठे आव्हान आहे. कारण या दोन्हींच्या आधाराने जी वापरण्यायोग्य अशी संगणक आणि मोबाईल आधारित संसाधने तयार करण्यात आली आहेत त्याच्या वापराच्या अनुषंगाने प्रतिक्रिया, अभिप्राय, सूचना यांची नितांत गरज असते.
आपला देश या दृष्टीने एक परिपूर्ण प्रयोगशाळा आहे असे सारे जग मानते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे संगणक आणि मोबाईलचा सर्वदूर असलेला प्रसार. ते वापरण्यास सक्षम असा विविध वयोगटातील समाज. वीज आणि मोबाईल टॉवरची पुरेशी उपलब्धता. इंग्रजी साक्षर असणारा समाज. प्रांत आणि भाषा यातील वैविध्य. या बळावर भारत हा अर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि नवनवीन सॉफ्टवेअर यांचे जागतिक चाचणी केंद्र झाला आहे.

सर्वाधिक वापरकर्ते

चॅटजीपीटी असो वा जेमिनी या दोन्हींचे सर्वांत जास्त वापरकर्ते भारतात आहेत. अर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि सॉफ्टवेअर क्षेत्रातील जागतिक महाशक्ती या प्रक्रिया किंवा वापर उपरांतची माहिती आणि अभिप्राय यासाठी सर्वस्वी भारतावर अवलंबून आहेत. भविष्यात अर्टिफिशियल इंटेलिजन्सचे स्वरूप घडवण्यासाठी या माहिती आणि अभिप्रायाचा फार उपयोग होणार आहे. सॉफ्टवेअरची बहुभाषक प्रारूपे तपासण्यासाठी भारत ही एक सहज उपलब्ध मोठी वापरकर्ती जनसंख्या आहे. उदाहरणार्थ. चॅटजीपीटीच्या मासिक सक्रीय वापरकर्त्यांची जागतिक संख्या ही सप्टेंबर २०२५ मध्ये ७०२ मिलियन अर्थात ७२ कोटी, ऑक्टोबर २०२५ मध्ये ७५० मिलियन अर्थात ७५ कोटी, नोव्हेंबर २०२५ मध्ये ७७० मिलियन अर्थात ७७ कोटी होती आणि त्यातील भारतातील वापरकर्त्यांची संख्या ही सप्टेंबर ते नोव्हेंबर २०२५ या काळात सातत्याने १६ टक्के राहिली आहे. भारताने चॅटजीपीटीच्या मासिक सक्रीय वापरकर्त्यांच्या यादीत अमेरिका आणि ब्राझील यांनासुद्धा मागे टाकले आहे. जेमिनीबाबत सुद्धा अशीच परिस्थिती राहिलेली आहे. जेमिनीच्या मासिक सक्रीय वापरकर्त्यांची जागतिक संख्या ही सप्टेंबर २०२५ मध्ये २९८ मिलियन अर्थात २९.८ कोटी, ऑक्टोबर २०२५ मध्ये ३२० मिलियन अर्थात ३२ कोटी, नोव्हेंबर २०२५ मध्ये ३३० मिलियन अर्थात ३३ कोटी होती आणि त्यातील भारतातील वापरकर्त्यांची संख्या ही सप्टेंबर ते नोव्हेंबर २०२५ या काळात सातत्याने ३२.३ टक्के राहिली आहे.
आता उर्वरित जगातील वापरकर्ते यांच्या तुलनेत भारतातील वापरकर्ते हे संख्येने अधिक आणि विविध स्तरातील असतील, तर ती वापर आणि त्यान्वये वर्तन ही माहिती विश्लेषणासाठी निश्चितच अधिक उपयोगी ठरत आहे.
भारतात मोबाईलसाठीचा डेटा जागतिक स्तरावरील किंमतीच्या तुलनेत स्वस्त आहे. हा डेटा वापरणारा फार मोठा तरुण वर्ग भारतात उपलब्ध आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित विविध ॲप्सच्या वापरात सुद्धा भारतीय वापरकर्त्यांनी फार मोठी झेप घेतलेली आहे. भारत हा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित साधने मोठ्या प्रमाणावर स्वीकारणारा आणि वापरणारा देश ठरत आहे. भारत कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रात जगाचे नेतृत्व यापुढे करणार आहे असे म्हटले तर ते वावगे ठरू नये. डिजिटल अस्तित्व हे यापुढे सर्वांचे भवितव्य राहणार आहे. भारताची मोठे आणि वाढते डिजिटल अस्तित्व हे कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्र आणि वैयक्तिक जगणे प्रभावित करणार आहे. भारत या सर्वांना कसे प्रभावित करणार आहे, याला संख्याशास्त्रीय आधार आहे. जगात सर्वाधिक लोकप्रिय जी समाज माध्यमे आहेत त्यांच्या वापर परिस्थितीवरून आपल्याला डिजिटल अस्तित्व आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वापरकर्ते यांच्या सहसंबंधांची कल्पना येईल. जगातील मासिक सक्रीय वापरकर्ते यांची भारतातील सक्रीय वापरकर्ते यांची तुलना केली, तर भारताचा या क्षेत्रातील वाढता सहभाग सहज दिसून येतो. उदाहरणार्थ, व्हॉट्सॲप मेसेंजरचे जगातील सक्रीय मासिक वापरकर्ते हे ८५० मिलियन अर्थात ८५ कोटी आहेत. त्यातील ३२ टक्के हे एकट्या भारतातील आहेत. यु ट्यूबचे जगातील सक्रीय मासिक वापरकर्ते हे ७४५ मिलियन अर्थात ७४.५ कोटी आहेत. त्यातील २६ टक्के हे एकट्या भारतातील आहेत. गुगल मॅप्सचे जगातील





सक्रीय मासिक वापरकर्ते हे ५४५ मिलियन अर्थात ५४.५ कोटी आहेत. त्यातील २६ टक्के हे एकट्या भारतातील आहेत. इन्स्टाग्रामचे जगातील सक्रीय मासिक वापरकर्ते हे ४४० मिलियन अर्थात ४४ कोटी आहेत. त्यातील ३१ टक्के हे एकट्या भारतातील आहेत. फेसबुकचे जगातील सक्रीय मासिक वापरकर्ते हे ४१० मिलियन अर्थात ४१ कोटी आहेत. त्यातील २४ टक्के हे एकट्या भारतातील आहेत. स्नॅपचॅटचे जगातील सक्रीय मासिक वापरकर्ते हे २४० मिलियन अर्थात २४ कोटी आहेत. त्यातील ३८ टक्के हे एकट्या भारतातील आहेत. या संख्याशास्त्रीय वस्तुस्थितीवरून भारताचा या क्षेत्रातील दबदबा दिसून येतो. म्हणूनच यापुढे जगाला सॉफ्टवेअर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रात भारताशिवाय तरणोपाय नाही.

मोबाईल, मोफत विविध प्लॅन


भारतात समाज माध्यमे किती मोठ्या प्रमाणावर वापरली जातात आणि जगातील संपूर्ण आणि एकूण वापरकर्ते यांची संख्या त्याच्यापुढे प्रत्येक देशाचा स्वतंत्र विचार करता तोकडी भासते. व्हॉट्सॲप मेसेंजर, युट्यूब, गुगल मॅप्स, इन्स्टाग्राम, फेसबुक, स्नॅपचॅट ही सर्व साधने सॉफ्टवेअर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित असताना तसेच त्याच्यातील भारताचा वापरकर्ता म्हणून मोठा सहभाग असताना त्यातून वापर, वर्तन, आवड, निवास, उपयोग, अपेक्षा याबाबतचा अहवाल आपोआप निर्माण होत आहे. त्याचे विश्लेषण हे सॉफ्टवेअर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यामध्ये सुधारणा, अद्ययावतता, अचूकता निर्माण करण्यास खूप उपयोगी ठरत आहे. संगणक साक्षर तरुणवर्ग, वीज आणि संगणक तसेच मोबाईलची सुलभ उपलब्धता, विविध स्तरातील आणि बहुभाषक लोकसंख्या हे सर्व अनोखे असे जिवंत चाचणी क्षेत्र अथवा प्रयोगशाळा जगात कुठेच उपलब्ध नाही. त्यामुळेच कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात जगाला यापुढे भारताशिवाय तरणोपाय नाही.
या वस्तुस्थितीला अनुलक्षून दुसरे वर्तमान असे आहे की, ज्या आस्थापना मोबाईल जोडणी अर्थात सीम कार्ड आधारित ग्राहक संख्या बाळगून आणि सांभाळून आहेत त्यांच्यामार्फत अनेक इतर सेवा या मोफत पुरवल्या जात आहेत. उदाहरणार्थ, जिअ-ोची ग्राहक संख्या ही ५०.६ कोटी आहे. यातील फाईव्ह जी वापरकर्त्यांना जिओने प्रो प्लॅन ऑफ गुगल जेमिनी १८ महिन्यांसाठी मोफत देऊ केला आहे. त्याची बाजारातील किंमत ही पस्तीस हजार रुपये आहे. त्यामध्ये गुगल वन वर २ टी बी चा स्टोरेज, विओ ३.१ एआय व्हिडिओ टूल, नोटबुक एल एम, गुगल वर्क स्पेस आणि नॅनो बनाना हे सर्व मिळत आहे. भारती एअरटेलचे ग्राहक हे ३६.४ कोटी आहेत. त्यांनी आपल्या सर्व माध्यमातील सर्व सक्रीय वापरकर्त्यांना १२ महिन्यांचा परप्लेक्झीटी प्रो मोफत देऊ केले आहे. त्याची बाजारातील किंमत ही सतरा हजार रुपये आहे. आता प्री असो पेड वापरकर्ता अथवा ब्रॉडबँड असो वा डीटीएच. सर्वांना एवढी सर्व कृत्रिम बुद्धिमत्तेची संसाधने आपल्या संगणक, लॅपटॉप, मोबाईलवर उपलब्ध होत आहेत. त्याचा वापर, उपयोग, हाताळणी, तपासणी, ते रुळणे आणि अंगवळणी पडणे हे वाढणारच आहे. त्यातून निर्माण होणारा माहितीचा साठा याचे पृथक्करण करून जागतिक स्तरावरील मोठमोठ्या सॉफ्टवेअर कंपन्या त्यांची कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील उत्पादने अधिकाधिक सुधारित स्वरूपात जगापुढे आणणार आहेत. त्यासाठीची एक संशोधन आणि विकास याची प्रयोगशाळा म्हणून यापुढे जगाला भारताशिवाय तरणोपाय नाही.

**बाजारपेठ, संशोधन, विकास**

अमेरिकेने भारतावर निर्बंध लादले. भारताच्या सर्व क्षेत्रातील चौफेर प्रगतीच्या वाटेत अडथळे उभारण्याचे काम प्रगत राष्ट्रे करू पाहत आहेत. भारतीय माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील मनुष्यबळाला त्रासदायक ठरतील अशी धोरणे अमेरिकन प्रशासन राबवीत आहे. सिलिकॉन व्हॅलीतील भारताचा प्रभाव अमेरिका झाकून टाकू पाहत आहे. पण हे शक्य नाही हे सॉफ्टवेअर क्षेत्रातील नामांकित कंपन्या अमेरिकेला दाखवून देत आहेत. कारण आंतरराष्ट्रीय राजकारण यापेक्षा व्यापार महत्त्वाचा आहे हे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या जाणतात. येणारे युग हे कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील व्यापकतेचे असणार आहे हे जाणून जगाला जे हवे ते देण्याची क्षमता बाणवण्यासाठी शोधलेली आणि विकसित केलेली साधने, उपकरणे ही वापराच्या, उपयोगिता, सुलभतेच्या निकषावर तपासली जायला हवीत. ती करण्याची जिवंत अशी समूह विविधता अनायासे भारतात उपलब्ध असताना जग फार मोठ्या आशेने भारताकडे पाहत आहे.
ओपन एआय, गुगल आणि मेटा या कंपन्या भारतातील वैविध्यपूर्ण आणि बहुभाषक माहिती संग्रहण आणि संकलनावर अवलंबून आहेत. सुदैवाने भारत या क्षेत्रातील आवश्यक असा कच्चा माल जसे की उपयोग, माहिती आणि अभिप्राय उपलब्ध करून देत आहे. त्याचा उपयोग करून घेत या कंपन्या त्यांची कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रारूपांना सुव्यवस्थित, आकारबद्ध आणि प्रशिक्षित करत आहेत. या सर्व अद्ययावतीकरणामुळे सॉफ्टवेअरचा दर्जा आणि मूल्य वाढत आहे. जगात फक्त देवाण घेवाणीची व्यावहारिक भाषा प्राधान्याने चालते. आपापले व्यापारी आणि सामरिक हित आधी पाहिले आणि जोपासले जातात. या पार्श्वभूमीवर यापुढे भारताचे अस्तित्व हे केवळ एक बाजारपेठ म्हणून राहत नाही. तर माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे भवितव्य म्हणून भारताची अनिवार्यता जगाच्या पटलावर उमटलेली दिसते. भारत आता कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील संशोधन आणि विकास क्षेत्रातील एक अढळ स्थान मिळवण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. त्यामुळे आता आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आर्थिक क्षेत्रातील घडामोडी, घासाघीस आणि करारमदार या अनुषंगाने भारताचा वरचष्मा राहील असे चित्र आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील प्रयोगशाळा आणि वापरकर्ते या बळावर भारत जगात यापुढे अधिसत्ता गाजवेल अशी चिन्हे आहेत. नव्या वर्षाच्या अर्थात २०२६ च्या सुरुवातीला ही चांगली बातमी समस्त भारतीयांना

## पौष्टिक खा, फिट राहा!

### डॉक्टर टीप्स



नव्या वर्षात तुम्ही फिटनेसच्या दृष्टीनं काही संकल्प करत असाल तर त्याची सुरुवात आतापासून करणं गरजेचं आहे. सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू लागला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या...

स्पिनिंग

या व्यायाम प्रकारात सायकल चालवण्यास प्राधान्य दिलं जातं. हे हृदय आणि फुफ्फुसासाठी फायदेशीर असतं. तुमच्या पायांच्या स्नायूंना देखील बळकटी मिळते. सायकलींमध्ये येणाऱ्या नवनव्या तंत्रज्ञानामुळे लोकांची सायकल चालवण्यात रुची वाढली आहे. सोबतच व्यायाम करण्यासाठी इतर पर्यायांसोबतच सायकलचा वापर देखील वाढत चालला आहे.
(**क्रमशः**)





## विनोद

राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले ?
राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## संदेश

Tourist = Ye kiska kankaal hai..?
Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..
Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?
Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha….

## सुविचार




शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.
– कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा:
साात्विकप्रिया : ।।
अर्थ – जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार सात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तर

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार
११.परवाना १२.आराम १४.घरदार
१६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी
२०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर
२७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान
३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण
४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर
४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी
५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान
५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार
६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत
७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर
८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तर

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन
५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत
१०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके
१५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क
२६.रस २७.साधारण ३०.कसकस
३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक
३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान
४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण
४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार
५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार
६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा
७०.सहाय्यक
७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार
७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### रोहित-विराट टिकले, शमीला धक्का, काही स्टार्स मिळणार प्रमोशन

मुंबई : बीसीसीआय लवकरच भारतीय क्रिकेटपटूंसाठी



२०२६ चा सेंट्रल कॉन्ट्रॅक्ट जाहीर करणार असून, यंदा या यादीत मोठे आणि धक्कादायक बदल पाहायला मिळण्याची शक्यता आहे. काही दिग्गज खेळाडूंचे ग्रेड बदलले जाणार आहेत, तर काही युवा खेळाडूंना मोठं प्रमोशन मिळू शकतं.

सर्वात चर्चेचा मुद्दा म्हणजे विराट कोहली आणि रोहित शर्मा. दोघेही आतापर्यंत अ+ ग्रेडमध्ये होते, मात्र यावेळी त्यांना अ ग्रेडमध्ये खाली आणले जाऊ शकते. दुसरीकडे, सध्याच्या फॉर्म आणि सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर जसप्रीत बुमराह, शुभमन गिल आणि अक्षर पटेल यांना अ+ ग्रेडमध्ये बढती मिळण्याची दाट शक्यता आहे. याशिवाय, ऋतुराज गायकवाड, ध्रुव जुरेल, अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन यांसारखे खेळाडू इ ग्रेडमध्ये कायम राहू शकतात. विजय हजारे ट्रॉफीत दमदार कामगिरी करणारा देवदत्त पडिक्कल देखील यावेळी सेंट्रल कॉन्ट्रॅक्टचा भाग होण्याची शक्यता आहे. पण मोहम्मद शमीचा पत्ता कट होऊ शकतो. मागील सेंट्रल कॉन्ट्रॅक्टच्या अ+ ग्रेडमध्ये किती खेळाडू होते? १ ऑक्टोबर २०२४ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीतील करारानुसार टी२० मधून निवृत्त असूनही बीसीसीआयने कोहली आणि रोहित यांना अ+ ग्रेडमध्ये ठेवले होते.

### दो भाई... दोनों तबाही! १६ षटकार, १४ चौकार आणि २१७ धावा...

**मुंबई–**''हार मानायची नाही'' हीच जिद्द उराशी बाळगून सरफराज खान मैदानात उतरतो, आणि टीम इंडियामध्ये स्थान मिळवण्यासाठी प्रत्येक संधीचं सोनं करण्याचा प्रयत्न करतो. सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये असलेल्या सरफराजने २०२५ वर्षाचा शेवट त्याच्या नवी केला. त्याने प्रचंड बोलबाला गाजवेल अशा खेळीने शेवट केला आहे. विजय हजारे ट्रॉफीमध्ये ३१ डिसेंबर रोजी गोव्याविरुद्ध खेळताना त्याने फलंदाजीचा अक्षरश: कहर केला. जयपूरमध्ये झालेल्या या सामन्यात गोव्याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारली. मुंबईकडून चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या सरफराजने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला. मैदानाच्या चारही बाजूंनी फटके मारत त्याने गोव्याच्या गोलंदाजांना सावरायची संधीच दिली नाही.

**अवघ्या ५६ चेंडूत शतक**

सरफराजने केवळ ५६ चेंडूंमध्ये शतक झळकावून सामना पूर्णपणे मुंबईच्या बाजूने वळवला. शतकानंतर तर तो आणखीनच धोकादायक झाला. पुढील १९ चेंडूंमध्ये त्याने तब्बल ५७ धावा ठोकल्या आणि अवघ्या ७५ चेंडूंमध्ये १७५ धावांची विस्फोटक खेळी साकारली. या खेळीत त्याने अफाट स्ट्राइक रेटने फलंदाजी करत १४ षटकार आणि ९ चौकारांची आतषबाजी केली.

या कामगिरीसह सरफराजने मुंबईकडून लिस्ट-ए क्रिकेटमधील सर्वात वेगवान शतकाचा विक्रमही आपल्या नावावर केला. यापूर्वी हा विक्रम रोहित शर्माच्या नावावर होता, पण सरफराजने तो पूर्णपणे मागे टाकला.

### ब्रेव्हिस अन् रुदरफोर्डने मिळून खेचले सलग ६ चेंडूत ६ षटकार

नवी दिल्ली –दक्षिण आफ्रिकेत सध्या दक्षिण आफ्रिका क्रिकेट लीग स्पर्धेचा थरार सुरू झाला आहे. या स्पर्धेत आतापर्यंत एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहायला मिळाले आहेत. या स्पर्धेची सुरूवात २६ डिसेंबरपासून झाली. पण ३१ डिसेंबरला झालेल्या फलंदाजांनी धावांचा पाऊस पाडला. एमआय केपटाऊन आणि प्रिटोरिया कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात प्रिटोरिया कॅपिटल्स संघातील फलंदाजांनी अशी काही फटकेबाजी केली, जे पाहून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला.

या स्पर्धेतील आठवा सामना न्यूलँड्सच्या मैदानावर पार पडला. प्रिटोरिया कॅपिटल्स संघातील फलंदाजांनी या सामन्यात फलंदाजी करताना तुफान फटेबाजी केली. डावातील शेवटच्या षटकात फलंदाजी करताना डेवाल्ड ब्रेव्हिस आणि शेरफेन रुदरफोर्डने एमआस केपटाऊन संघातील गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. दोघांनी शेवटी फलंदाजी करताना सलग ६ चेंडूत ६ षटकार मारले. या जोडीने मिळून एकूण २८ चेंडू खेळून काढले,यादरम्यान ११ चेंडू सीमारेषेपार पोहोचवले. मुख्य बाब म्हणजे यापैकी ६ चेंडूत ६ सलग षटकार लगावले गेले.तर झाले असे की, प्रिटोरिया कॅपिटल्स संघाची फलंदाजी सुरू असताना, डेवाल्ड ब्रेव्हिस आणि शेरफेन रूदरफोर्ड दोघेही स्ट्राईकवर होते. त्यावेळी १८ वे षटक

## एकदिवसीय संघातील पंतचे स्थान धोक्यात?

नवी दिल्ली : यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंतला सध्या सुरू असलेल्या विजय हजारे करंडक एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरी करता आलेली नाही. त्यामुळे न्यूझीलंडविरुद्धच्या आगामी एकदिवसीय मालिकेसाठी पंतच्या भारतीय संघातील स्थानाला धोका निर्माण होऊ शकतो. मात्र, गेल्या १८ महिन्यांत पंतला केवळ एक आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामना खेळण्याची संधी देण्यात आली आहे. त्यामुळे त्याला इतक्यातच संघातून डच्चू मिळणे अन्यायकारक ठरू शकेल.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेला ११ जानेवारीपासून प्रारंभ होणार आहे. या मालिकेसाठी येत्या दोन-तीन दिवसांत भारताची संघनिवड अपेक्षित आहे. त्याआधी पंतच्या स्थानावरून चर्चा सुरू झाली आहे. संघ व्यवस्थापनातील एका सदस्याला पंतची धोका पत्करून खेळण्याची शैली फारशी आवडत नाही, हे आता लपून राहिलेले नाही. पंतने फलंदाजी करताना पारंपरिक शैलीचा अवलंब करावा असे त्याचे म्हणणे आहे. मात्र, गेल्या १८ महिन्यांत केवळ एक सामना खेळण्याची संधी देऊन



**भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेला ११ जानेवारीपासून प्रारंभ होणार आहे. या मालिकेसाठी येत्या दोन-तीन दिवसांत भारताची संघनिवड अपेक्षित आहे.**

खेळाडूला वगळल्यास अजित आगरकर यांच्या निवड समितीबाबत आणखी प्रश्न उपस्थित होऊ शकतील. अलीकडेच झालेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी पंतचा भारतीय संघात समावेश होता. श्रेयस अय्यर जायबंदी असल्याने पंतला उपकर्णधारपदाची जबाबदारीही देण्यात आली. मात्र, त्याला एकही सामना खेळण्यास मिळाला नाही. दोन वर्षे एकदिवसीय संघाबाहेर असलेल्या ऋतुराज गायकवाडचे पुनरागमन झाले आणि त्याला थेट चौथ्या क्रमांकावर खेळविण्यात आले. पंत मात्र संधीच्या प्रतीक्षेतच राहिला. २०१८ साली एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यापासून पंतने सात वर्षांत केवळ ३१ सामने खेळले आहेत. एकदिवसीय प्रारूपात त्याच्या क्षमतेबाबत अजूनही प्रश्न कायम आहेत.यष्टिरक्षकाच्या स्थानासाठी स्पर्धा

विजय हजारे स्पर्धेत दिल्लीचे नेतृत्व करताना पंतला चारपैकी केवळ एका सामन्यात अर्धशतक साकारता आले. याउलट झारखंडसाठी यष्टिरक्षक-फलंदाज इशान किशनने कर्नाटकविरुद्ध सलामीच्या सामन्यातच तडाखेबंद शतक केले. यात १४ षटकारांचाही समावेश होता. ध्रुव जुरेलनेही उत्तर प्रदेशकडून खेळताना चार सामन्यांत एक दीडशतक आणि दोन अर्धशतके साकारली. त्यामुळे त्याचीही दावेदारी भक्कम झाली आहे. एकदिवसीय संघात केएल राहुल पहिल्या पसंतीचा यष्टिरक्षक-फलंदाज आहे. राखीव म्हणून जुरेलचे स्थान निश्चित मानले जात आहे. अन्य एका स्थानासाठी आता पंत आणि किशन यांच्यात स्पर्धा असू शकेल.

## जसप्रीत बुमराहने घडवला इतिहास!



मुंबई-भारतीय संघातील वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने २०२५ वर्षाच्या शेवटी एकही सामना न खेळता मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. त्याने असं काही करून दाखवलं आहे,जे याआधी कुठल्याही भारतीय वेगवान गोलंदाजाला करता आलं नव्हतं. गेल्या काही महिन्यात त्याला गोलंदाजीत आपली छाप सोडता आली नव्हती, पण आयसीच्या रँकिंगमध्ये त्याचा बोलबाला पाहायला मिळाला. आयसीसी कसोटी रँकिंगमध्ये त्याने नंबर १ स्थान मिळवलं आणि ते शेवटपर्यंत कायमही ठेवलं. यासह त्याने आयसीसीच्या रँकिमध्ये मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे.आयसीसीने जाहीर केलेल्या कसोटी रँकिंगनुसार जसप्रीत बुमराह या यादीत अव्वल स्थानी कायम आहे. यासह तो कसोटी रँकिंगमध्ये २ वर्ष नंबर १ स्थानी राहिलेला पहिलाच भारतीय वेगवान गोलंदाज ठरला आहे. याआधी २०२४ वर्षाच्या शेवटी देखील तो नंबर १ स्थानी होता. असा परक्रम याआधी कुठल्याही भारतीय वेगवान गोलंदाजाला करता आलेला नाही.

## टीम इंडियाला मिळणार नवा कोच?

**नवी दिल्ली:**भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्ड मोठा निर्णय घेत टीम इंडियामध्ये मोठा बदल करणार आहे. भारतीय क्रिकेट संघाला आता नवा कोच मिळणार आहे. इंग्लंडचा दिग्गज खेळाडू आता ही जबाबदारी सांभाळताना दिसणार आहे.

भारतीय महिला क्रिकेट संघाबाबत (ढशरा खपवळर) भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने एक मोठा निर्णय घेतला आहे. संघाला नवीन कोच मिळणार आहे. भारतीय संघात लवकरच एक नवीन स्ट्रेंथ आणि कंडिशनिंग कोचची एंट्री होणार आहे. महिला प्रीमियर लीग (थझङ २०२६) नंतर या कोचची नियुक्ती केली जाईल. इंग्लंडच्या एका अनुभवी खेळाडूवर ही जबाबदारी सोपवण्यात येणार आहे. थझङ २०२६ नंतर भारतीय महिला क्रिकेट संघ हा ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जाणार आहे. याच दौऱ्यापासून संघाना एक नवा स्ट्रेंथ आणि कंडिशनिंग कोच मिळेल.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने इंग्लंडच्या निकोलस ली यांची संघाचे नवीन स्ट्रेंथ आणि कंडिशनिंग कोच म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. २०२६ च्या

### टीम इंडियाला मिळणार नवा कोच ? हा दिग्गज सांभाळणार जबाबदारी

महिला प्रीमियर लीगच्या समाप्तीनंतर ते संघात सामील होतील. या वर्षीची थझङ येत्या ९ जानेवारीपासून सुरू होणार असून ती ५ फेब्रुवारीपर्यंत चालेल. त्यानंतर लगेचच, भारतीय महिला संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. तिथे १५ फेब्रुवारी ते ९ मार्च दरम्यान विविध फॉरमॅटमधील मालिका खेळल्या जाणार आहेत. डब्ल्यूपीएलनंतर, निकोलस ली हे भारतीय महिला क्रिकेट संघाचे नवीन स्ट्रेंथ आणि कंडिशनिंग प्रशिक्षक अऱ्आथत कोच म्हणून पदभार स्वीकारतील, अशी माहिती एका सूत्राने पीटीआयला दिली..

निकोलसकडे मोठा अनुभव

निकोलस ली यांना क्रिकेट आणि एलीट स्पोर्ट्समध्ये व्यापक अनुभव आहे. ते माजी प्रथम श्रेणी क्रिकेटपटू असून, त्यांनी १३ सामन्यांमध्ये ४९० धावा केल्या आहेत. त्यांनी अलीकडेच यूएईच्या आयएलटी२० लीगमध्ये गल्फ जायंट्स संघासोबत काम केले आहे. त्यांनी यापूर्वी जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२५ पर्यंत अफगाणिस्तान क्रिकेट संघाचे स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग कोच म्हणून काम पाहिले होते. मार्च २०२० ते जानेवारी २०२४ पर्यंत त्यांनी बांगलादेश क्रिकेट बोर्डात फिजिकल परफॉर्मन्स हेड म्हणूनही काम पाहिले. ऑक्टोबर २०१५ ते मार्च २०२- पर्यंत ते श्रीलंका पुरूष संघासोबत जोडलेले होते.

स्थानिक पातळीवर, ली यांनी मार्च २०१२ ते सप्टेंबर २०१६ पर्यंत ससेक्स काउंटी क्रिकेट क्लबमध्ये मुख्य प्रशिक्षक म्हणून काम पाहिले आणि त्यापूर्वी जानेवारी २०१० ते मार्च २०१२ पर्यंत सहाय्यक प्रशिक्षक होते. ते अँग्लिया रस्किन विद्यापीठाची पदवीधर आहेत. ऑस्ट्रेलियाच्या आव्हानात्मक दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर, ली यांची नियुक्ती भारतीय महिला संघासाठी महत्त्वाची ठरणार आहे. त्यांच्या कौशल्यामुळे संघाच्या तंदुरुस्ती आणि कामगिरीमध्ये नवीन ऊर्जा निर्माण होईल अशी अपेक्षा आहे.

## न्यूझीलंडविरुद्ध मालिकेसाठी भारतीय संघाची या दिवशी संघाची घोषणा

कर्नाटक-कर्नाटकचा डावखुरा फलंदाज देवदत्त पडिक्कल विजय हजारे ट्रॉफीत आपल्या जबरदस्त फॉर्मची घोडदौड कायम ठेवताना अवघ्या ४ सामन्यांत तिसरे शतक ठोकले आहे. अहमदाबादमध्ये पुडुचेरीविरुद्ध शतकी खेळी पुन्हा एकदा त्याला भारतीय वनडे संघाच्या निवडीच्या चर्चेच्या केंद्रस्थानी घेऊन आली आहे. २५ वर्षीय पडिक्कलने अएअ रेल्वे क्रिकेट मैदानावर खेळल्या गेलेल्या या सामन्यात ११६ चेंडूत ११३ धावा करत शानदार खेळी साकारली. सातत्यपूर्ण कामगिरीमुळे पडिक्कल चर्चेत याआधी या स्पर्धेत पडिक्कलने झारखंडविरुद्ध १४७ धावा आणि केरळविरुद्ध १२४ धावांची दमदार शतके झळकावली होती. तिसऱ्या सामन्यात तमिळनाडूविरुद्ध फक्त १२ चेंडूत २२ धावा केल्या होत्या. मात्र तरीही चार सामन्यांत ४०५ धावा करत तो या हंगामातील सर्वात सातत्यपूर्ण फलंदाजांपैकी एक ठरला आहे.

कर्नाटकचा वरचष्मा, सलामीत २२८ धावांची भागीदारी

पुडुचेरीविरुद्धच्या लढतीत कर्नाटकने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि सुरुवातीपासूनच सामन्यावर पकड मिळवली. देवदत्त पडिक्कल आणि कर्णधार मयंक अग्रवाल यांनी पहिल्या विकेटसाठी २२८ धावांची भागीदारी करत जवळपास ३८ षटके खेळली. या भागीदारीमुळे सामना पूर्णपणे एकतर्फी झाला. पडिक्कलला अखेर जयंत यादवने ११३





धावांवर बाद केले. त्याच्या खेळीत १० चौकार आणि ४ षटकार मारले होते.

लिस्ट-अ क्रिकेटमधील भक्कम आकडे

देवदत्त पडिक्कलचे लिस्ट-अ क्रिकेटमधील आकडे त्याच्या सातत्याची साक्ष देतात. आतापर्यंत अवघ्या ३६ डावांत त्याने १२ शतके आणि १२ अर्धशतके झळकावली आहेत, हा कन्व्हर्जन रेट कोणत्याही फलंदाजासाठी असामान्य मानला जातो. सुरुवात मोठ्या खेळीत रूपांतरित करण्याची क्षमता त्याला देशांतर्गत वनडे क्रिकेटमधील सर्वाधिक विश्वासार्ह फलंदाजांमध्ये स्थान देत आहे.

**भारतीय संघात संधी मिळणार?**

पडिक्कलने भारतासाठी २ कसोटी आणि २ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले असले तरी, वनडेमध्ये अद्याप पदार्पणाची संधी मिळालेली नाही. पुढील काळात भारताचा व्हाईट-बॉल बिझी शेड्यूल असणार असून, अशा वेळी विजय हजारे ट्रॉफीतील त्याची ही कामगिरी योग्य वेळी आली आहे.भारतीय संघाची घोषणा कधी होण्याची अपेक्षा आहे?न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी संघाची घोषणा ३ किंवा ४ जानेवारी रोजी होण्याची अपेक्षा आहे. वृत्तानुसार, संघाची घोषणा ऑनलाइन बैठकीद्वारे केली जाईल किंवा मुख्य निवडकर्ता मुंबईत पत्रकार परिषद घेऊ शकतात.

त्यानंतर निवडलेला संघ ७ जानेवारीपर्यंत वडोदरा येथे पोहोचण्याची अपेक्षा आहे, जिथे भारत पहिला एकदिवसीय सामना खेळेल. या संघात अनुभवी विराट कोहली आणि रोहित शर्मा यांची निवड होण्याची अपेक्षा आहे. उपकर्णधार श्रेयस अय्यर देखील परतणार आहे, तर कर्णधार शुभमन गिल देखील पुनरागमन करेल.

## झिम्बाब्वेचा सिकंदर रजाच्या १३ वर्षीय भावाचा दुर्दैवी मृत्यू

मुंबई –झिम्बाब्वे क्रिकेट संघाचा टी-२० कर्णधार सिकंदर रजा यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. रजा यांचा धाकटा भाऊ मोहम्मद महदीचे वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी निधन झाले आहे. या दुर्दैवी घटनेमुळे केवळ झिम्बाब्वे क्रिकेटच नव्हे, तर संपूर्ण क्रिकेटविश्वात शोककळा पसरली आहे. झिम्बाब्वे क्रिकेट बोर्डाने अधिकृत निवेदन जारी करत या दु:खद बातमीला दुजोरा दिला आहे.

बोर्डाने सांगितले की, मोहम्मद महदीचे २९ डिसेंबर २०२५ रोजी हरारे येथे निधन झाले. तो जन्मापासूनच महिमोफिलियाफ या गंभीर आजाराने ग्रस्त होता. अलीकडे प्रकृती अधिक बिघडल्याने त्याची प्राणज्योत मालवली. ३० डिसेंबर रोजी हरारेतील वॉरेन हिल्स स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

झिम्बाब्वे क्रिकेट बोर्डाने व्यक्त केला शोक

झिम्बाब्वे क्रिकेट बोर्डाने आपल्या निवेदनात म्हटले आहे, मफ्झिम्बाब्वे क्रिकेट, आपल्या टी-२० कर्णधार सिकंदर रजा आणि त्यांच्या कुटुंबीयांप्रती मनापासून शोक व्यक्त करत आहे. या कठीण काळात बोर्ड, खेळाडू आणि संपूर्ण स्टाफ रजा कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. ईश्वराने कुटुंबाला हे दु:ख सहन करण्याची ताकद द्यावी आणि मोहम्मद महदीच्या आत्म्यास शांती लाभो, हीच प्रार्थना.फ्क

सोशल मीडियावर व्यक्त झाला रजाचा आक्रोश

या दु:खद घटनेनंतर सिकंदर रजानीही सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली भावना व्यक्त केली. त्यानी झिम्बाब्वे क्रिकेट बोर्डाचे निवेदन शेअर करत तुटलेल्या हृदयाचा इमोजी पोस्ट केला, जो त्यांच्या वेदना स्पष्टपणे दर्शवत होता. क्रिकेट चाहते तसेच सहकारी खेळाडू रजाना सातत्याने धीर देत आहेत.

कारकिर्दीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर वैयक्तिक आघात

ही वैयक्तिक शोकांतिका अशा वेळी घडली आहे, जेव्हा सिकंदर रजा आपल्या कारकिर्दीच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर आहेत. नुकत्याच झालेल्या घ्थ्ऊ२० २०२५ स्पर्धेत त्याने शारजाह वॉरियर्स संघासाठी शानदार कामगिरी केली होती. १० सामन्यांत १७१ धावा आणि १० विकेट्स घेत रजाने आपली अष्टपैलू क्षमता पुन्हा एकदा सिद्ध केली होती.

## एकच सामन्यात पाच भारतीय फलंदाजांनी ठोकलं शतक, विश्वविक्रम म्हणून नोंद



### पडिक्कलचा विजय हजारे ट्रॉफीत धुमाकूळ, टीम इंडियात होणार कमबॅक?

**नवी दिल्ली:** विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ स्पर्धेच्या चौथ्या फेरीत बडोदा आणि हैदराबाद यांच्यात सामना रंगला. या सामन्यात एकूण पाच शतकं ठोकली गेली. त्यामुळे या सामन्याची जोरदार चर्चा रंगली आहे. लिस्ट ए क्रिकेटमध्ये हा नवा विश्वविक्रम नोंदवला गेला आहे. विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ स्पर्धेत एका विश्वविक्रमाची नोंद झाली आहे. लिस्ट ए क्रिकेटमध्ये यापूर्वी असं कधीच घडलं नव्हतं. चौथ्या फेरीत बडोदा आणि हैदराबाद हे संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात पाच फलंदाजांनी शतक ठोकलं.

या सामन्यात बडोद्याच्या तीन फलंदाजांनी, तर हैदराबादच्या दोन फलंदाजांनी शतक ठोकलं. या सामन्यात अशी पाच शतकं आली. लिस्ट ए क्रिकेटमध्ये असं पहिल्यांदाच घडलं. बडोद्याकडून नित्या पंड्याने १०० चेंडूत १२२ धावा ठोकल्या. यात १२ चौकार आणि १ षटकार मारला. अमित पासीने ९३ चेंडूत १२७ धावा ठोकल्या. यात त्याने १२ चौकार आणि ७ षटकार मारले. बडोद्याकडून मग कर्णधार कृणाल पंड्या उतरला आमि त्याने ६३ चेंडूत नाबाद १०९ धावांची खेळी केली. यात १८ चौकार आणि १ षटकार मारला.

यावेळी त्याचा स्ट्राईक रेट १७३.०३चा होता. कृणाल पंड्याने लिस्ट ए क्रिकेटमध्ये तिसऱ्यांदा शतक ठोकलं आहे.

हैदराबादकडून अभिरथ रेड्डीने ९० चेंडूत १३० धावा केल्या. यात १८ चौकार आणि २ षटकार मारले. तर प्रज्ञान रेड्डीने ९८ चेंडूत ११३ धावा केल्या. पण दोघंही संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत. बडोद्याने ४१८ धावांचं टार्गेट ठेवलं होतं.

हैदराबादने ३८० धावांपर्यंत मजल मारली. हैदराबादकडून अभिरथ रेड्डीने ९० चेंडूत १३० धावा केल्या. यात १८ चौकार आणि २ षटकार मारले. तर प्रज्ञान रेड्डीने ९८ चेंडूत ११३ धावा केल्या. पण दोघंही संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत. बडोद्याने ४१८ धावांचं टार्गेट ठेवलं होतं. हैदराबादने ३८० धावांपर्यंत मजल मारली.

# तुतारीच्या निनादात सोलापुरात सोनार गुणवंतांचा गौरव - महाकुंभाची सांगता

## समाज गौरव सोहळा आणि योजना शिबीर उत्साहात संपन्न

**सोलापूर/प्रतिनिधी :** हुतात्मा नगरी सोलापूर येथे रविवार दि. २८ डिसेंबर २९२५ रोजी सोनार समाज संस्थेच्यावतीने आयोजित समाज गौरव सोहळा व शासकीय योजना माहिती शिबीर अत्यंत भव्य -दिव्य आणि मंगलमय वातावरणात पार पडले. विशेष म्हणजे प्रत्येक पुरस्कार्थिंचा सन्मान होताना वाजणाऱ्या तुतारीच्या ऐतिहासिक निनादाने संपूर्ण निर्मिती लॉन्स दणाणून गेले होते. या सांस्कृतिक शाही थाटाने सोहळ्याची शोभा अधिकच द्विगुणित केली. महापालिका निवडणूक प्रशासनाच्या परवानगीने आचार संहितेच्या सर्व नियमांचे पालन करत एकही राजकीय व्यक्ती मंचावर न बोलवता केवळ समाज हितासाठी राबविलेला हा उपक्रम सोलापूरच्या सामाजिक इतिहासात मैलाचा दगड ठरला आहे.




**मान्यवरांचे मार्गदर्शन**

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार सर यांनी समाजाच्या संघटन शक्तीचे कौतुक केले. प्रमुख पाहुण्या सौ. कौशिकी कारीकर, कोल्हापूर, डॉ. ज्ञानेश्वर पंडित, विजयपूर यांनी प्रबोधन केले. कौशल्य विकास योजनेचे जिल्हा समन्वयक श्री. राम सुतार यांनी सुवर्णकार करागिरीसाठीच्या असलेल्या शासकीय योजनांची सखोल माहिती दिली. या प्रसंगी ऑल इंडिया सोनार फेडरेशन चे जिल्हा अध्यक्ष व प्रसिद्ध सराफ व्यावसायिक श्री. प्रमोद भैय्या वेदपाठक माढा यांची उपस्थिती लाभली.

**भक्ती -शक्तीचा संगम**

श्री. संत शिरोमणी नरहरी महाराज मंदिर समिती पंढरपूरच्या नव नियुक्त पदाधिकारी व विश्वस्त मंडळाचा सन्मान चिन्ह व गुलाब पुष्प देऊन नागरी सत्कार करण्यात आला. यामध्ये माजी अध्यक्ष भारत कारीकर, उपाध्यक्ष मोहन मंद्रूपकर, कार्यवाह संजय आष्टीकर, खजिनदार सुरेश पंडित विश्वस्त सुभाष दादा वेदपाठक यांचा समावेश होता.

**पुरस्कार वितरण सोहळा**

यामध्ये ३६ समाज भूषण ०१ आदर्श शिक्षक रत्न ०२ हिरकणी, ०१ आदर्श माता पिता,०३ अभियंत्रिकी उत्कृष्ठता ०१ प्रेरणा व्यक्तिमत्व, ०३ कृतज्ञता पुरस्कार, ०२ आदर्श उद्योग रत्न, ०८ युवा उद्योग सुवर्ण रत्न मान्यवरांचा समावेश होता.

**प्रमुख उपस्थिती**

या सोहोळ्याला मिरज येथील प्रसिद्ध सराफ व उद्योजक श्री. अजीत पोतदार वशीकर, सौ. ऐश्वर्या पोतदार वशीकर, सुरेशराव महामुनी, प्रकाशराव तपासे, प्रकाश पोतदार, किरण पोतदार, अवधूत महामुनी, डॉ. मनोज वेदपाठक, चंद्रकांत वेदपाठक, सतीश वेदपाठक, अमोल दीक्षित, पदमकुमार दीक्षित, मोहन वेदपाठक गुरुजी, श्रीमती शशिकला वेदपाठक, सौ. साधना वेदपाठक, सौ. उज्वल आपचुंदेकर, डॉ. नमिता वेदपाठक उपस्थित होते. नियोजन आणि आभार. संस्थेचे अध्यक्ष वसंत पोतदार यांनी प्रास्ताविकातून सोहळ्याची भूमिका मांडली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन लक्ष्मीकांत वेदपाठक यांनी केले. ५०० हुन अधिक समाज बांधवांच्या उपस्थितीने या सोहोळ्याला महाकुंभाचे स्वरूप प्राप्त झाले होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थित समाज बांधवानी सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतला आणि सुवर्ण सोहोळ्याची यशस्वी सांगता झाली.

**यांचा झाला सन्मान**

समाज भूषण डॉ. ज्ञानेश्वर पंडित विजयपूर, अतुल पोतदार पुणे, प्रकाश पोतदार सांगली, विलास वेदपाठक तुळजापूर, उदयकुमार माणकापुरे कोल्हापूर, सतीश महामुनी व शिवाजी महामुनी बीड, डॉ. प्रमोद पाचणकर पुणे, डॉ. विनोद वेदपाठक अंबाजोगाई, अक्षय महामुनी सांगोला, हेमंतकुमार महामुनी पंढरपूर, वासुदेव वेदपाठक धाराशिव,महेश अनाळकर पुणे, मधुकर महाले छ. संभाजीनगर, विवेकानंद जडे लातूर, सुनील वेदपाठक कोल्हापूर, संजय क्षीरसागर गोंदावले बु., सतीश पोतदार सोलापूर, सुधीर पंडित करमाळा, महेश दीक्षित विटा, श्रीमती विजया महामुनी जेऊर, रामचंद्र दीक्षित, सूर्यकांत पंडित, सौं छाया व उमेश वेदपाठक, सौ. सुधा व विनायक मंगरूळकर सोलापूर,श्रीमती संजीवनी पानगे लोणी प्रवरानगर, संतोष तुळजापूरकर, महेंद्र दीक्षित सोलापूर, राहुल तपासे वैराग, श्रीमती सविता दादजवार हदगांव नांदेड, डॉ. अतुक क्षीरसागर उपळाई बु., सौं सविता बारसकर उदगीर, सौं. सविता पंडित निलंगा, सुनील महामुनी तुळजापूर, सुनील वेदपाठक बेंबळी धाराशिव, भागवत पोतदार कुरनूर अक्कलकोट, आदर्श शिक्षक रत्न प्रसाद धर्माधिकारी तुळजापूर.

**आदर्श उद्योग रत्न**

उमेश वेदपाठक तुळजापूर, संतोष दीक्षित मुरुड.

**हिरकणी**

इंजि. कु. श्रेया कुरुलकर,सोलापूर, इंजि. सौं. अमृता वेदपाठक माढा

**आदर्श माता -पिता**

सौ. रेखा व मधुकर कुमठेकर,

अभियांत्रिकी उत्कृष्ठता

इंजि. अभिषेक सोनार जेऊर अक्कलकोट,इंजि.सौ.श्रुतीवइंजि.ओंकार धर्माधिकारी मसूर कराड, प्रेरणा व्यक्तिमत्व प्रीतम भास्करे सोलापूर

**कृतज्ञता पुरस्कार**

संपादक विनोद पोतदार पंढरपूर संपादक विरभद्र पोतदार दूधनी, राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत कु. अनुष्का दीक्षित हिस सन्मान चिन्ह देऊन सन्मान आणि अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

**युवा उद्योग सुवर्ण रत्न,**

इंजि. गोरक्ष वेदपाठक मोडनिंब, इंजि. प्रथमेश वेदपाठक माढा, प्रज्ञेश पंडित कोल्हापूर / बार्शी, प्रसाद पोतदार सोलापूर, अभिषेक पोतदार भुरीकवठे अक्कलकोट, श्रीनिवास पोतदार आरग सांगली, ऋषिकेश धाराशिवकर, हरिओम व श्रीहरी कुरुलकर सोलापूर. आदिचा समावेश होता.

## अर्चना गुंजाळ-शिंदे यांना पीएच. डी.

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयातील इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका अर्चना गुंजाळ-शिंदे यांना छत्रपती संभाजीनगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने इंग्रजी विषयातील पीएच. डी. पदवी बहाल केली.



गुंजाळ-शिंदे यांनी बार्शी (जि. सोलापूर) येथील शिवाजी महाविद्यालयातील प्रा. डॉ. अनिल कट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली वुमन सबज्युगेशन ॲण्ड अमॅनसिपेशन इन द सिलेक्ट वर्क ऑफ बुची इमेचेटा: अ स्टडी या विषयावर शोधप्रबंध विद्यापीठाला सादर केला होता. त्यानिमित्त त्यांना पीएच. डी. पदवी प्रदान केली. गुंजाळ-शिंदे यांच्या यशाबद्दल मार्गदर्शक डॉ. अनिल कट्टे, डॉ. पांडुरंग शितोळे, डॉ. मुस्तजीब खान, डॉ. रमेश चौगुले, डॉ. समाधान पवार, निवृत्त प्राचार्य बाबासाहेब गुंजाळ, सतीश पवार, रणधीर निंबाळकर, ईश्वरप्रसाद बिदादा आदींनी अभिनंदन केले.

## प्रा. मंजुषा शिंदे-भांडवलकर यांना पीएच. डी.

**लातूर/प्रतिनिधी :** येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील प्रा. मंजुषा शिंदे-भांडवलकर यांना छत्रपती संभाजीनगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएच. डी. पदवी प्रदान केली.



प्रा. शिंदे-भांडवलकर यांनी बार्शी (जि. सोलापूर) येथील शिवाजी महाविद्यालयातील प्रा. डॉ. अनिल कट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली आमोस टुटुओला यांच्या निवडक साहित्यकृतींमधील लोकसाहित्याचा अभ्यास या विषयावर शोधप्रबंध तयार करून विद्यापीठाला सादर केला. त्यांच्या संशोधनात आफ्रिकन साहित्यातील लोकसाहित्य, लोककथा, मिथक व सांस्कृतिक परंपरांचा अभ्यास करण्यात आला. प्रा. शिंदे-भांडवलकर यांना पीएच. डी. मिळाल्यानिमित्त प्रा. डॉ. अनिल कट्टे, डॉ. मुस्तजीब खान, डॉ. रमेश चौगुले, डॉ. पांडुरंग शितोळे, डॉ. समाधान पवार यांनी अभिनंदन केले.

## महापारेषणच्या वार्षिक दैनंदिनी व प्लॅनर-२०२६ चे थाटात प्रकाशन



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) वार्षिक दैनंदिनी, प्लॅनर व दिनदर्शिका-२०२६ चे प्रकाशन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या हस्ते थाटात झाले.

यावेळी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने, कंपनी सचिव विनीता श्रीवानी, मुख्य अभियंता श्री. किशोर गरूड, श्री. अमित नाईक, श्री. माणिक गुट्टे, श्री. किशोर गरूड, श्री. संदीप हाके, श्री. प्रमोद चिमणकर, श्री. अनिल भारसाकळे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती सीमा डुबेवार, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सुरूवातीला महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी नववर्षाच्या शुभेच्छा देऊन उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना संदेश दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी केले.

**डिजिटल क्यू-आर दैनंदिनी व दिनदर्शिका**

महापारेषणच्या जनसंपर्क विभागाने कायमच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. यावर्षीही मराठी, इंग्रजी दैनंदिनी, प्लॅनर व दिनदर्शिका-२०२६ ही क्यू-आर कोड वापरून संपूर्णतः डिजिटल पध्दतीने बनविली आहे. याबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी जनसंपर्क विभागाचे कौतुक केले.

## रो. विश्वनाथ स्वामी (सावळे) यांच्यातर्फे रोटरी आधार रुग्ण सेवा केंद्राला ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर भेट

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील रुग्णांच्या विविध गरजा पुरविण्यासाठी रोटरी आधार रुग्ण सेवा केंद्राची निर्मिती नुकतीच करण्यात आली आहे. या केंद्राद्वारे रुग्ण, नातेवाईक आणि कुटुंबीयांना उपचारानंतरच्या आरोग्य विषयक वस्तू व साधने मोफत आणि अल्प दरामध्ये उपलब्ध करून दिल्या जातात. तसेच आरोग्य सेवा सुद्धा रुग्णांना पुरविण्यात येते. आधार रुग्ण सेवा केंद्रामध्ये सर्व पदाधिकारी हे रोटरी क्लबचे सर्व सदस्य आहेत. अशा या अत्यंत महत्त्वपूर्ण केंद्राला नुकतेच रो. विश्वनाथ स्वामी (सावळे) यांनी ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर डोनेट केले आहे. यावेळी कॉपच्या अध्यक्ष डॉ. मायाताई कुलकर्णी आणि सचिव तथा रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनचे अध्यक्ष रो. डॉ. गुणवंत बिरादार, रो. माधव पांडे आणि रो. विश्वनाथ स्वामी (सावळे) यांचे कुटुंबीय यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी रो. विश्वनाथ स्वामी (सावळे) यांनी रोटरी आधार रुग्णसेवा केंद्राला ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरची भेट देऊन भविष्यातही आवश्यक असणाऱ्या बाबी डोनेट करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. यावेळी डॉ. मायाताई कुलकर्णी यांनी आणि रो. डॉ. गुणवंत बिरादार यांनी रो. विश्वनाथ स्वामी (सावळे) यांचे अभिनंदन करून त्यांनी दिलेल्या डोनेशन बद्दल समाधान व्यक्त केले तसेच समाजातील दानशूर व्यक्तींनी या केंद्राला अर्थसहाय करावे असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.



## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'विशाखा काव्य पुरस्कार २०२५' साठी कवितासंग्रह पाठविण्याचे आवाहन

**नाशिक/प्रतिनिधी :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनामार्फत नवोदित कवींकडून सन २०२५ च्या विशाखा काव्य पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. यानुसार इच्छुक कवींनी सन २०२५ मध्ये प्रकाशित झालेला आपला पहिला मराठी काव्यसंग्रह येत्या ३१ जानेवारी २०२६ पर्यंत विद्यापीठात 'प्रमुख कुसुमाग्रज अध्यासन' या पत्त्यावर केवळ टपालाद्वारे पाठवावा, असे आवाहन कुसुमाग्रज अध्यासनातर्फे करण्यात आले आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या नावाने स्थापित अध्यासनामार्फत, त्यांच्या सुप्रसिद्ध 'विशाखा' या काव्यसंग्रहाच्या नावाने नवोदित कवींच्या मराठी भाषेतील प्रथम काव्यसंग्रहास दरवर्षी पुरस्कार दिला जातो. यंदा विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली या पुरस्काराची नियमावली निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रकाशित झालेल्या काव्यसंग्रहांमधून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

या पुरस्कारासाठी अर्ज करण्यासाठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही. सादर करण्यात येणारा काव्यसंग्रह केवळ मराठी भाषेतील असावा व त्यावर प्रकाशन वर्ष ठळकपणे मुद्रित केलेले असणे आवश्यक आहे. तसेच, संबंधित काव्यसंग्रहाची यापूर्वी कोणतीही ई-आवृत्ती प्रकाशित झालेली नसावी. पुरस्कारासाठी कवी स्वतः किंवा संबंधित प्रकाशक अर्ज पाठवू शकतात.



अर्जासोबत काव्यसंग्रहाच्या पाच प्रती, कवीची पासपोर्ट आकाराची दोन छायाचित्रे, सविस्तर परिचयपत्र तसेच हा काव्यसंग्रह कवीचा प्रथमच प्रकाशित झालेला असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. प्रतिज्ञापत्र संलग्न नसल्यास संबंधित काव्यसंग्रह पुरस्कारासाठी विचारात घेतला जाणार नाही. प्रतिज्ञापत्राचा नमुना विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. परिचयपत्रामध्ये कवीचा संपूर्ण पत्ता, ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद केलेला असावा.

काव्यसंग्रह केवळ टपालाद्वारेच पाठवावेत. खाजगी कुरीयर सेवेद्वारे पाठविलेले काव्यसंग्रह स्वीकारले जाणार नाहीत. पाकीटावर 'विशाखा काव्य पुरस्कारासाठी' असा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. या पुरस्कारासंबंधी विद्यापीठ व निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

या पुरस्कारासाठी पात्र व इच्छुक कवींनी आपला काव्यसंग्रह ३१ जानेवारी २०२६ पर्यंत प्रमुख, कुसुमाग्रज अध्यासन, ज्ञान स्रोत केंद्र इमारत, पहिला मजला, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, गोवर्धन, नाशिक ४२२२२२ या पत्त्यावर केवळ टपालाद्वारे पाठवावा.

अधिक माहिती व सविस्तर नियमावलीसाठी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे व कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी केले आहे.

## वीज कनेक्शन हमखास वेळेत मिळण्यासाठी महावितरणची नवी व्यवस्था

**धाराशिव/प्रतिनिधी :** ग्राहकाने अर्ज केल्यानंतर महानगरांमध्ये तीन दिवसात, शहरांमध्ये सात दिवसात आणि ग्रामीण भागात १५ दिवसात नवे वीज कनेक्शन देण्याच्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कालमर्यादेची तंतोतंत अंमलबजावणी करण्यासाठी महावितरणने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यपद्धतीत बदल केला आहे. त्यामुळे ग्राहकांना वीज कनेक्शनसाठी वाट पहावी लागणार नाही, असा विश्वास महावितरणच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

महावितरणकडून मुंबईचा काही भाग वगळता संपूर्ण राज्यात वीज पुरवठा सेवा दिली जाते. ग्राहकांना नव्या वीज कनेक्शनसाठी ऑनलाईन अर्ज करता येतो. अर्जासोबत दाखलेही जोडता येतात. महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून अर्जाची व कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर ग्राहकाला शुल्क भरण्याची सूचना दिली जाते. ग्राहकाने पैसे भरले की, नवा मीटर जोडून ग्राहकाला वीज कनेक्शन दिले जाते.

सध्याची ही पद्धती अर्ज केल्यापासून नवे कनेक्शन दिल्याची यंत्रणेत नोंद होण्यापर्यंत पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आली आहे. यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक टप्प्यावर देखरेख करण्यात येत आहे. त्यामुळे वीज ग्राहकांना हमखास आयोगाने ठरवून दिलेल्या कालमर्यादेत नवी जोडणी मिळण्याचा विश्वास महावितरणच्या प्रशासनाला वाटतो.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने नवीन वीज कनेक्शनसाठी अर्ज केल्यानंतर महानगरांसाठी तीन दिवस, शहरांसाठी सात दिवस आणि ग्रामीण भागात १५ दिवसात कनेक्शन देण्याची तरतूद केली असली तरी ती जेथे पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, त्यासाठी ही कालमर्यादा आहे. विजेचे खांब उभारून व तारा जोडून वीज पुरवठा उपलब्ध करण्यासारखी पायाभूत सुविधांची कामे गरजेची असतील तर तेथे ९० दिवसात वीज जोडणी देण्याची कालमर्यादा आयोगाने निश्चित केली आहे.

नव्या वर्षात सुरुवात - महावितरणच्या प्रशासनाने केलेल्या सुधारणेमुळे नवीन वीज कनेक्शन देण्याच्या कामात गतीमानता येईल आणि अधिक पारदर्शकता येईल, असाही विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. नवे वीज कनेक्शन देण्याच्या बाबतीत महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कोठे दिरंगाई होत असेल तर माहिती तंत्रज्ञानामुळे नेमक्या कोणत्या टप्प्यावर विलंब झाला हे समजेल. परिणामी एकूण प्रक्रियेची गती वाढविणे शक्य झाले आहे. महावितरणची ही व्यवस्था १ जानेवारी २०२६ पासून सुरू झाली आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्कः (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# रेणापूरच्या लोकनियुक्त भाजपाच्या नगराध्यक्षा शोभा शामराव अकनगिरे यांनी स्वीकारला पदभार

## शहराचा सर्वांगीण विकास हेच ध्येय – अभिषेक आकनगिरे

**लातूर/प्रतिनिधी :** तब्बल गेली तीन वर्षे प्रशासकांच्या ताब्यात असलेल्या रेणापूर नगरपंचायतीच्या लोकनियुक्त भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्षा शोभाताई शामराव अकनगिरे यांनी आज गुरुवारी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. यावेळी झालेल्या कार्यक्रमात रेणापूर शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय असे प्रथम नगराध्यक्ष तथा नगरसेवक अभिषेक आकनगिरे यांनी बोलून दाखविले.

रेणापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी गेल्या २० डिसेंबर रोजी पार पडलेल्या निवडणुकीत लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वातील भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्ष उमेदवारासह दहा नगरसेवक बहुमताने विजयी होऊन रेणापूर नगरपंचायतीवर पुन्हा एकदा भाजपाचा झेंडा फडकला. नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्ष शोभा शामराव आकनगिरे यांचा पदग्रहण सोहळा गुरुवार दि. १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी संपन्न झाला. मोठ्या उत्साहाच्या वातावरणात फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. यावेळी रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी रोहित आरबोळे, अहमदपूरचे प्रतीक लंबे, प्रशासकीय अधिकारी प्रदीप पाटील, ज्योती वलांडे, अंकुश फड, अमोल बाजुळगे, महमूद शेख या अधिकारी कर्मचाऱ्यासह नवनिर्वाचित नगरसेवक अभिषेक आकनगिरे, सुमन मोटेगावकर, सुनिता बसतापुरे, दत्ता सरवदे, धरती गाडे, रबियाबी शेख, हुसेना शेख, खैरोनिसा आत्तार, ज्योती चव्हाण, वाहेद शेख, प्रदीप राठोड त्याचबरोबर अधिकारी, भाजपचे पदाधिकारी व नागरिक




मोठ्या संख्येने उपस्थित होते. पदभार स्वीकारल्यानंतर अनेकांनी शोभाताई आकनगिरे यांचे पुष्पगुच्छ देऊन पेढा भरून अभिनंदन केले.

यावेळी नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने नगराध्यक्षा शोभा आकनगिरे यांच्यासह सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक अभिषेक आकनगिरे म्हणाले की, गेल्या तीन वर्षात प्रशासकीय कार्यकाळात नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. केंद्र आणि राज्यातील भाजपा शासनाच्या माध्यमातून आ. रमेशआप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी आणू. येणारी पाच वर्षे ही जनतेची असतील, नागरी सुविधासह रेणापूर शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरपंचायतीचे ज्ञानदेव दहिफळे यांनी केले. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन दोघे मिळून निश्चितपणे रेणापूरच्या विकासाला गती देण्याचे काम करू अशी ग्वाही दिली.

याप्रसंगी भाजपाचे बापूसाहेब कुलकर्णी, अच्युत कातळे, श्रीनिवास अकनगिरे, चंद्रकांत कातळे, दिलीप आकनगिरे, विजय चव्हाण, श्रीकृष्ण मोटेगावकर, उज्वल कांबळे, दिलीप राजे, राजकुमार आलापुरे, महेश काळे, हनुमंत भालेराव, उमेश सोमाणी, धनराज बरुरे, बंडू एचवाड, प्रभाकर बोरुडे, सुरेश भंडारे, उत्तम चव्हाण, दिलीप चव्हाण, गणेश चव्हाण, सुभाष राठोड, शेख अजीम, नरसिंग येलगटे, शिवाजी भावे, अंगद काळे, संजय वीरुळे, राजकुमार आकनगिरे, शेख शहंशाह, साधू लोकरे, खुद्दुस शेख, अंकित हाके, शंकर चक्रे, नंदकुमार बंडे, जगन्नाथ कातळे, सलीम शेख, शरद चक्रे, अंकुश मोटेगावकर, योगेश राठोड, कुमार आकनगिरे, धम्मानंद घोडके, ज्ञानेश्वर शिंदे, निलेश हुलगुंडे, मुनाफ शेख, सुरेश खोबरे, मनोज चक्रे, साताप्पा खोबरे, फारूक कुरेशी यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी लोकप्रतिनिधी रेणापूर येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लक्ष्मी अर्बन को-ऑप.बँकेत दिनदर्शिकेचे प्रकाशन

**लातूर/प्रतिनिधी :** मराठवाड्यातील अग्रगण्य लक्ष्मी अर्बन को-ऑप.बँक लि, लातूरच्या वतीने काढण्यात आलेल्या आगामी २०२६ या नूतनवर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन शुक्रवार दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी बँकेच्या कव्हा रोड, लातूर येथील मुख्य कार्यालयात करण्यात आले.




दिनदर्शिका प्रकाशन कार्यक्रम बँकेचे चेअरमन अशोकजी अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली व विशेष अतिथी म्हणून पत्रकार शशिकांतजी पाटील न्युज १८ लोकमत व आकाशवाणी लातूर जिल्हा रिपोर्टर, राजेंद्रजी खराडे उपसंपादक दै. पुण्य नगरी व दिपरत्नजी निलंगेकर (संपादक युतीचक्र व दुरदर्शन जिल्हा प्रतिनिधी) यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. बँकेचे चेअरमन अशोकजी अग्रवाल यांनी बँकेच्या विविध योजनांची माहिती दिली. प्रिंट मिडिया, डिजीटल मिडियाच्या माध्यमातून बँकेच्या योजना ग्राहकांपर्यंत पोहचवण्यास पत्रकार बांधवांचे मोलाचे सहकार्य लाभत आले आहे, असे मत व्यक्त केले. पत्रकार शशिकांतजी पाटील यांनी यावेळी मनोगत व्यक्त करताना बँकेच्या उत्तुंग यशाबद्दल बँकेच्या संचालक मंडळाचे अभिनंदन केले.

लातूर जिल्ह्यातील पहिली डिजीटल बँकिंग सुविधा पुरवणारी अधुनिक बँक म्हणुन बँकेचा नावलौकिक आहे. दिनदर्शिकाच्या माध्यमातून बँकेच्या योजना, पंचांग व दिनविशेष ग्राहकांना पाहता येईल, असे मत व्यक्त केले.

यावेळी बँकेचे व्हा.चेअरमन सतिशजी भोसले, व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मीकांतजी सोमाणी, जेष्ठ पत्रकार तथा संचालक सूर्यप्रकाशजी धुत, संचालक अजितलालजी आळंदकर, शशिकांतजी मोरलावार, गणेशची हेडडा, आशिषजी अग्रवाल,सौ. कमलादेवी राठी, सौ. माला भुतडा, मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाशजी आळंदकर, वरिष्ठ अधिकारी सुशिल जोशी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अधिकारी सुशिल जोशी यांनी केले व व्हा. चेअरमन सतिशजी भोसले यांनी आभार मानले.

# स्थापत्य अभियंता अनंत पाटील यांना 'वास्तु विशारद' पदवी प्रदान

**लातूर/प्रतिनिधी :** येथील सुप्रसिद्ध स्थापत्य अभियंता श्री. अनंत शिवाजीराव पाटील यांना वास्तु विशारद ही मानाची पदवी पुणे येथील ज्योतिष वास्तु विश्व संशोधन केंद्र या संस्थेच्या वतीने नुकतीच प्रदान करण्यात आली.

ज्योतिष वास्तु विश्व संशोधन केंद्र, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या वास्तुशास्त्र विषयक परीक्षेत अनंत पाटील यांनी विशेष श्रेणीत यश संपादन केले. गेल्या वीस वर्षांपासून ते लातूर शहरासह परिसरात वास्तुशास्त्रानुसार घरबांधणीचे नकाशे, मार्गदर्शन तसेच बांधकाम



निर्मितीचे कार्य सातत्याने करीत आहेत.

त्यांच्या स्थापत्य कौशल्यातून आजपर्यंत शेकडो आकर्षक व शास्त्रशुद्ध वास्तू साकार झाल्या असून त्यांनी वास्तुशास्त्रासोबतच अंकशास्त्र या विषयातही विशेष प्राविण्य मिळवले आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक कुटुंबांना वास्तुशास्त्राच्या दृष्टीने योग्य आणि समाधानकारक घरे लाभली आहेत.

या उल्लेखनीय यशाबद्दल स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील अभियंते, बांधकाम व्यवसायिक, निर्माते, कामगार तसेच नागरिकांकडून अनंत पाटील यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

# थर्टी फर्स्टला जल्लोष नव्हे, जबाबदारी!

### वसुंधरा प्रतिष्ठानकडून पोलिसांना चहा-पाणी, बेघरांना मायेची शाल

लातूर : नववर्षाच्या स्वागतासाठी अनेकजण जल्लोषात रमले असताना, लातूरमधील तरुणांनी मात्र सामाजिक भान जपत एक वेगळाच आदर्श घडवला. थर्टी फर्स्टच्या रात्री बंदोबस्तावर तैनात असलेल्या पोलिसांसाठी चहा-बिस्किटे व पाण्याची व्यवस्था करत, तसेच थंडीने कुडकुडणाऱ्या बेघर नागरिकांना शाल वाटप करत वसुंधरा प्रतिष्ठानने नववर्षाची सुरुवात सेवाभावाने केली.

३१ डिसेंबरच्या सायंकाळी १२ ते १ जानेवारी पहाटे ३ वाजेपर्यंत वसुंधरा प्रतिष्ठानचे पदाधिकारी लातूर शहरातील विविध चौकात फिरले. छत्रपती शिवाजी महाराज चौक, महात्मा गांधी चौक, गंजगोलाई, रेणापूर नाका, पाच नंबर चौक, गुळ मार्केट, विवेकानंद चौक आदी ठिकाणी तैनात असलेल्या पोलीस बांधवांना थंडीपासून दिलासा मिळावा म्हणून गरम चहा, बिस्किटे व पाणी देण्यात आले. नववर्षाचा उत्सव कुठेही अनुचित



प्रकारांशिवाय पार पडावा यासाठी रात्रभर उभ्या असलेल्या पोलिसांना या उपक्रमामुळे क्षणभर उबदारपणा मिळाला.

दरम्यान, शहरात वाढलेल्या कडाक्याच्या थंडीचा फटका बेघर नागरिकांना अधिक जाणवत असल्याचे लक्षात घेऊन, वसुंधरा प्रतिष्ठानने १ जानेवारीच्या मध्यरात्री लातूरच्या मुख्य बसस्थानकावर माणुसकीचा हात पुढे केला. थंडीने कुडकुडणाऱ्या नागरिकांना मायेची शाल पांघरली. चहा-बिस्किटांचेही वाटप करण्यात आले. वसुंधरा प्रतिष्ठान दरवर्षी अशाच पद्धतीने पोलिसांसोबत आणि गरजू नागरिकांसोबत नववर्ष साजरे करत असल्याचे संस्थापक अध्यक्ष प्रा. योगेश शर्मा यांनी सांगितले. या उपक्रमाबद्दल पोलिसांनी समाधान व्यक्त करत प्रतिष्ठानचे आभार मानले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष रामेश्वर बावळे, कार्याध्यक्ष अमोल आप्पा स्वामी, अध्यक्ष डॉ. अजित चिखलीकर, सोशल मीडिया प्रमुख शिवाजी निरमनाळे, मुख्य समन्वयक राहुल माशाळकर, जिल्हा उपाध्यक्ष गौस मणियार, शहराध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी आदींनी विशेष परिश्रम घेतले. नववर्षाच्या जल्लोषातही माणुसकी आणि जबाबदारी जपणारा हा उपक्रम सध्या लातूरमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे.

## बंडोबा ..

वेळेवरी ते बंडोबा
बाबा थंडोबा करा
विध्वंस करे समंध
शांत झालेला बरा

आयाराम गयाराम
सांभाळावा नखरा
सांगेलं तसे ऐकेल
जो कार्यकर्ता खरा

अस्वस्थ आत्म्याचा
जपायचा नीट तोरा
कान पिळून गप्प रे
करा आपल्या पोरा

उंच चढवा सरासरा
पेरून ठेवून हरभरा
जपून जराअहंकारा
आपला कोरम भरा

आयारामा मुश्किले
आणलेआपले दारा
शीतल चंद्र बिचारा
अधिक चमके तारा

कधीही चढेलं सररा
निसटूनजाईलं पारा
बंड महाशयाभोवती
कडक गुपित पहारा

जिंकून तरी येऊ द्या
बदलणार खेळसारा
कटू धोरण स्विकारा
बाजूनेवाहताचं वारा

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# नवीन वर्षाचा पहिला दिवस २५० तुळस रोपे लावून साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** आमच ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन सदस्यांनी आज सकाळी आपल्या दैनदिन कार्याचा अखंड २४०७ व्वा दिवस पूर्ण केला. नवीन वर्षाच्या पहाटे एमआयडीसी परिसरातील राधाकृष्ण मंदिर परिसरात तुळस व स्वस्तिक फुलांची फुलझाडे लावून नव वर्ष साजरा केला.




ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन सदस्यांनी रात्री उशिरा जागणे, पार्टी करणे अशा पद्धतीला फाटा देऊन पहाटे अंधारात लवकर उठून नर्सरीतुन रोपे घेतली, पूर्वनियोजित स्थळी जाऊन परिसराची स्वच्छता करून, खड्डे खोदून तुळस व फुलझाडांचे रोपण केले. झाडांना भरपूर पाणी दिले.

परिसरातील नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले. नवीन वर्षात वृक्ष लागवड, वृक्ष संगोपन सोबत शहर स्वच्छतेला अग्रक्रमाने प्राधान्य देण्यात येईल असे ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन तर्फे डॉ. भास्करराव बोरगावकर यांचे द्वारे सांगण्यात आले.


टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


## राष्ट्रीय कृत्रिम दंत रोपण परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील

# डॉ. सागरिका मिसाळ, डॉ. यश भिकाणे, डॉ योगिनी शेंडे, डॉ श्वेता मिश्रा व डॉ. मोनिका बागेश्वर संशोधनास प्रथम पुरस्कार

**लातूर/प्रतिनिधी :** इंडियन प्रोस्थोडोंटिक सोसायटी च्या वतीने नुकत्याच घेण्यात आलेल्या ५३ व्या राष्ट्रीय प्रोस्थोडोंटिक परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील कृत्रिम दंत रोपण विभागातील एम.डी.एस. पदव्युत्तर विद्यार्थी डॉ.सागरिका मिसाळ, डॉ यश भिकाणे, डॉ योगिनी शेंडे, डॉ श्वेता मिश्रा व डॉ. मोनिका बागेश्वर यांच्या संशोधनास प्रथम पारितोषिक मिळाले आहे. या यशाबद्दल एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते सर्व विजेत्या संशोधकांचा गौरव करण्यात आला.

मुंबई येथे पार पडलेल्या तीन राष्ट्रीय प्रोस्थोडोंटिक परिषदेत दुसऱ्या दिवशी दुसऱ्या सत्रात डॉ.सागरिका मिसाळ, डॉ यश भिकाणे, डॉ योगिनी शेंडे व डॉ श्वेता मिश्रा यांनी ''सूक्ष्म सेन्सर द्वारे दंतहीन रुग्णांमध्ये सेंट्रिक



रिलेशन नोंदवणे'' या विषयावर सादर केलेल्या संशोधनास प्रथम पारितोषिक मिळाले तर डॉ मोनिका बागेश्वर यांनी ''तत्काळ इम्प्लांट बसवण्याच्या संदर्भात अल्व्हिओलर हाडाची मापे व नाकाच्या हाडा जवळील विस्ताराचे -आधारित विश्लेषण'' या विषयावर सादर केलेल्या शोध निबंधासही प्रथम पारितोषिक मिळाले आहे. या परिषदेत विविध शैक्षणिक व्याख्याने, थेट प्रात्यक्षिक, रिसर्च पेपर, रिसर्च पोस्टर व टेबल क्लिनिक अशा स्पर्धक उपक्रमांचा समावेश होता.

विजेत्या सर्व संशोधकांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील कृत्रिम दंत रोपण विभागातील एम.डी.एस. पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. अभिषेक गोले, डॉ. मयूर तुपटे, डॉ. योगेश्वरी भिसे, डॉ. प्रशंसा वैकुंठे, डॉ. अद्वैता आवाळे, डॉ. अक्षय मुचाटे, डॉ. श्रेयस मगर, डॉ. समर्थ रेवडकरी, डॉ. प्रशांत घोगरे, डॉ. वेदिका देशमुख यांच्यासह देशभरातील अनेक प्रख्यात प्रोस्थोडोंटिस्ट यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

या यशाबद्दल सर्व विजेत्या संशोधकांचे एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ यतिशकुमार जोशी, प्रोसथोडोंटिक्स विभाग प्रमुख डॉ. सुशैन गाजरे, डॉ. भूषण बांगर, डॉ. शशी पाटील, डॉ. शीतल वाघ, डॉ. विद्या वायबसे, डॉ. योगेश नागरगोजे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून अभिनंदन होत आहे.


निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६